दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com | नवी दिशा... नवे विचार..... | email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१५२ | शनिवार, दि.२७ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# शेतकऱ्यांना नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग बंद !

## २५ लाख शेतकऱ्यांवर ३५ हजार कोटींची थकबाकी, बँकर्स समितीचा अहवाल

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यात अतिवृष्टीने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार खरीप हंगामात ८६ लाख हेक्टर क्षेत्राला अतिवृष्टीचा फटका बसला आहे. त्यातच आता राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या अहवालातून शेतकऱ्यांवर ३५ हजार ४७७ कोटी रुपयांची थकबाकी असल्याची माहिती समोर आली आहे. यामध्ये २४ लाख ७३ हजार ५६६ शेतकऱ्यांचे कर्ज थकले आहे.



थकबाकीदार शेतकऱ्यांना बँकांकडून नव्याने कर्ज मिळण्याचा मार्ग बंद झाला आहे.

पान २ वर


### दहा जिल्ह्यांत सर्वाधीक बाकी

राज्यात सोलापूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बीड, बुलढाणा, जालना, परभणी, पुणे आणि यवतमाळ या दहा जिल्ह्यात सरासरी एक लाख ते दोन लाख शेतकरी बँकांचे थकबाकीदार आहेत. तर सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक पावणेतीन लाख शेतकऱ्यांकडे बँकांचे ३ हजार ९७६ कोटी रुपये थकल्याचे राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या माहितीवरून स्पष्ट झाले आहे. या दहा जिल्ह्यात शेतकऱ्यांवर ३० हजार कोटींची थकबाकी आहे. तर उर्वरित २२ जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर केवळ साडेतीन हजार कोटींची थकबाकी असल्याचे अहवालात सांगण्यात आले आहे.

### रब्बीसाठी शेतकऱ्यांना सावकारी कर्ज काढावे लागणार

शेतकऱ्यांना खरीप हंगामात मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा चिखल केला आहे. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांसमोर रब्बी हंगामाचे नियोजन कसे करावे, हा पेच निर्माण झाला आहे. खरीप हातातून गेल्याने पुढच्या हंगामासाठी कृषी निविष्ठा, मशागतीसाठी सावकारी कर्जावर अवलंबून राहावे लागणार आहे. कारण थकबाकीदार शेतकऱ्यांना बँका नव्याने कर्ज देण्यास तयार होत नाहीत.

# लातूर जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के



**लातूर । प्रतिनिधी**

**लातूर जिल्ह्यातील बोरवटी गावात शुक्रवारी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने ग्रामस्थांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. सकाळच्या वेळी अचानक जमिनीत हालचाल झाल्याची जाणीव झाल्यानंतर नागरिक घराबाहेर आले.**

भूकंप विज्ञान केंद्राने प्राथमिक चौकशीत दिलेल्या माहितीनुसार, लातूर जिल्ह्यात २.२ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप नोंदवण्यात आला आहे. हा धक्का सौम्य स्वरूपाचा असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे कोणतीही जीवितहानी अथवा मालमत्तेचे नुकसान झाल्याची माहिती समोर आलेली नाही. प्रशासनानेही नागरिकांना घाबरून न जाता सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच आपत्ती व्यवस्थापन पान २ वर

# अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त

## सरकारने केवळ घोषणा न करता तातडीने निर्णय घ्यावा-आ.जयंत पाटील



**बीड । प्रतिनिधी**

**मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. त्यामुळे सरकारने तातडीने ठोस मदत करावी, अशी मागणी शरद पवार राष्ट्रवादीचे नेते आ.जयंत पाटील यांनी बीड येथे केली.**

राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष आ.जयंत पाटील हे शुक्रवारी (दि.२६) रोजी पान २ वर

### एकरी किमान ५० हजार रुपयांची मदत द्यावी

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. काही दिवसांपासून सुरु असलेल्या अतिवृष्टीने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यामुळे एकरी किमान ५० हजार रुपये इतकी थेट मदत तातडीने दिली पाहिजे. सरकारने हप्ते पडून २५ हजार रुपयांचा पहिला हप्ता दिला पाहिजे.

### गायी, म्हशीसाठी ६० ते ७० हजार

अतिवृष्टीमुळे शेतीसह जनावरांचे देखील मोठे नुकसान झाले आहे. मोठ्या प्रमाणात जनावरे वाहून गेली आहे. जनावरांच्या किंमती वाढलेल्या आहेत. बाजारात सध्या ०१ लाख २० हजार पर्यंत गायी, म्हशींची किंमत आहे. सरकारने किमान ६० ते ७० हजार रुपये गायी, म्हशीं ज्या वाहून गेल्या आहेत त्याची नुकसान भरपाई द्यावी, शेळ्या - मेंढ्यासाठी १० हजार रुपये द्यावेत.

# अंगणवाडी सेविका व मदतनीसांना २ हजार रुपयांची दिवाळी भेट-मंत्री आदिती तटकरे

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना दिवाळीत भाऊबीजेच्या निमित्ताने प्रत्येकी दोन हजार रुपये भेट स्वरूपात देण्यात येणार आहेत, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी त्यांच्या अधिकृत ट्विटद्वारे दिली.**



राज्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनीस महिलांच्या आरोग्यासाठी आणि लहान मुलांच्या पोषणासाठी मनापासून दिवसरात्र काम करत असतात. त्यांच्या या कष्टांचा गौरव पान २ वर

# लढा सुरू ठेवायची की थांबायचा प्रा. लक्ष्मण हाके आज घेणार निर्णय

**अहिल्यानागर । प्रतिनिधी**



राज्यामध्ये ओबीसी आरक्षणासाठी पोट तिडकीने लढा देणारे प्रा. लक्ष्मण हाके गेल्या काही दिवसापासून विरोधकांच्या रडारवर असताना सहकारी असलेल्या काही कडूनच अवमान अवहेलना होत असल्याने आज दैत्यनगर येथे होणाऱ्या ओबीसी एल्गार मेळाव्यामध्ये ते आपली भूमिका जाहीर करणार आहेत ओबीसीचा हा लढा चालू ठेवायचा की थांबवायचा याबाबत निर्णय घेणार असल्याने या मेळाव्याकडे सर्वांचे लक्ष लागून आहेत.

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांनी लढा सुरू केल्यानंतर त्याविरुद्ध प्रा लक्ष्मण हाके नवनाथ वाघमारे एड मंगेश ससाने आदींनी ओबीसी आरक्षण बचावण्यासाठी लढा सुरू केला होता त्यानंतर मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण पान २ वर

### माळ सहावी



षष्ठीचे दिवशीं
भक्तां आनंद वर्तला हो ।।
घेउनि दिवट्या हस्तीं
हर्षे गोंधळ घातला हो ।
कवडी एक अर्पितां
देवी हार मुक्ताफळां हो ।।
जोगवा मागतां प्रसन्न झाली
भक्तकुळा हो ।। ६ ।।
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ।।

# तरुणाच्या खून प्रकरणी युवा सेनेच्या अध्यक्षासह चौघांवर गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

शहरात गुरूवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास यश देवेंद्र ढाका (वय २२, रा. बीड) या तरुणाचा चाकूने वार करून खून करण्यात आल्याची घटना शहरातील माने कॉम्प्लेक्स परिसरात घडली होती. याप्रकरणी काही वेळातच गुरूवारीच तातडीने काटे नामक तरुणाला ताब्यात घेतले गेले. तर शुक्रवारी युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष शिराळे यांच्यासह चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बीड येथील पत्रकार देवेंद्र ढाका यांचा मुलगा यश ढाका या बावीस वर्षे तरुणाचा मित्रानेच तीक्ष्ण हत्याराने वार करून गुरूवारी रात्री साडेनऊच्या सुमारास खून केला. या घटनेने शहरात खळबळ उडाली शिवाय शहरात या हत्येने भयावह परिस्थिती निर्माण झाली होती. घटनेनंतर पोलिसांनी गांभीर्य बघून काही तासातच एक आरोपीला अटक केली. मात्र अन्य आरोपीवर गुन्हा दाखल करावा आणि त्यांना तात्काळ पान २ वर

# मंत्री पंकजा मुंडेंनी घेतला पूरग्रस्त भागातील पशुधनाच्या हानीचा व सुरक्षिततेचा आढावा

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील अतिवृष्टी व पुरामुळे पशुधनाच्या झालेल्या हानीचा व त्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज आढावा घेतला. अतिवृष्टी व पुरामुळे मृत जनावरांच्या मालकांना योग्य ती शासकीय मदत मिळण्यासाठी पशुसंवर्धन विभागाने महसूल विभागाशी समन्वय साधावा, असे निर्देश



पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिले. तसेच अतिवृष्टी व पूरग्रस्त भागात जनावरांसाठी फिरती पशुवैद्यकीय पथके सक्रिय करून तात्काळ सेवा उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या. पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२६ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू:३१.५० क्विंटल | २,२०० | २,७५२ | २,५१८ |
| ज्वारी/हायब्रिड : ४७.५० क्विंटल | २,१११ | ३,२९० | २,३७० |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ३०.०० क्विंटल | ६,००० | ६,०९० | ६,०४० |
| उडीद : ७०.०० क्विंटल | ४,०९० | ५,८३६ | ५,०८१ |
| बाजरी: ४८.५० क्विंटल | २,१०० | २,७८० | २,५३१ |
| मुग:७.०० क्विंटल | ४,६५१ | ७,१०१ | ५,५७० |
| सोयाबीन: १२.०० क्विंटल | ३,५०० | ४,३०० | ३,९०० |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ४,७०१ | ५,२०० | ४,९८७ |

# त्या लाडक्या बहिणींकडून १५ कोटी वसूल होणार!



सरकारी नोकरी असतानाही ज्या महिलांनी लाभ घेतला त्यांच्यावर वसुलीसह शिस्तभंगाची होणार कारवाई

**मुंबई । प्रतिनिधी**

**लाडकी बहीण योजनेचा लाभ महिला सरकारी कर्मचाऱ्यांकडूनही घेतला जात असल्याची बाब समोर आली होती. या कर्मचाऱ्यांची संख्या आता ८ हजारांवर गेली आहे. या सर्व कर्मचाऱ्यांकडून लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून घेतलेल्या पैशांची वसुली करण्याचे आदेश वित्तविभागाने संबंधित विभागांना दिले आहेत. या महिला कर्मचाऱ्यांकडून वसूल करण्यात येणारी रक्कम सुमारे १५ कोटींच्या घरात असून, या कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाचीही कारवाई करण्यात येणार आहे.**

निवडणुकांआधी सरकारकडून करण्यात आलेल्या घोषणांमध्ये लाडकी बहीण योजना ही सर्वात लोकप्रिय ठरली. या योजनेतील लाभार्थ्यांची संख्या ही अडीच लाखांच्या घरात गेल्याने सरकारी तिजोरीवर मोठ्या प्रमाणात भार येत होता. यासाठी ३६०० हजार कोटींची तरतूदही अर्थसंकल्पात करण्यात आली. त्यामुळे या योजनेला कात्री लावण्याचा सरकारने निर्णय घेत, बोगस लाभार्थ्यांची छानणी सुरू करण्यात पान २ वर

### • पेन्शनधारकांचाही समावेश

या योजनेचा लाभ घेणाऱ्यांमध्ये सरकारी पेन्शन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. त्यामुळे लाभ घेणाऱ्या विद्यमान महिला कर्मचारी कार्यरत असलेल्या विभागांना महिला व बालकल्याण विभागाकडून कर्मचाऱ्यांची यादी दिली जाणार आहे. ही वसुली दोषी कर्मचाऱ्यांच्या वेतनातून किंवा निवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमधून टप्प्याटप्प्याने तसेच काही प्रकरणांत एकरकमी पद्धतीने केली जाणार आहे.

### • शिस्तभंगाची कारवाई होणार

याशिवाय दोषींवर केवळ वसुलीची कारवाईच नव्हे तर शिस्तभंगात्मक कारवाई करण्याचाही विचार सुरू आहे. महाराष्ट्र दिवाणी सेवा (आचरण, शिस्त आणि अपील) नियम १९७९ नुसार संबंधित महिला कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे. शासनाकडून या प्रकरणाची चौकशी सुरू असून, पुढील काही दिवसांत दोषींविरुद्ध कठोर निर्णय घेतला जाईल. त्यामुळे या योजनेतून अनुचित लाभ घेणाऱ्यांना दंडाला सामोरे जावे लागणार हे निश्चित आहे.

## थोडक्यात...

### महापालिकेसाठी शिंदे गटाचा १०० जागांवर दावा

मुंबई: सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर आता महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीच्या तयारीला वेग आला आहे. संपूर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे दोन्ही गट चांगलेच ॲक्टिव्ह झाले आहेत. दरम्यान, शिंदे गटानं मुंबई महापालिका निवडणुकीत निवडून आलेल्या सर्व शिवसेनेच्या जागांवर दावा सांगितला आहे. गेल्या महापालिका निवडणुकीत शिवसेनेनं ९३ जागा जिंकल्या होत्या. त्यावर एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेनेने दावा ठोकला आहे.

### एमबीबीएसच्या खासगी जागा फुल्ल

मुंबई : राज्यातील वैद्यकीय पदवी अभ्यासक्रमांच्या (एमबीबीएस व बीडीएस) प्रवेश प्रक्रियेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून जवळपास सर्वच जागा भरल्या गेल्या आहेत. खासगी महाविद्यालयांतील एमबीबीएसच्या जागा फुल्ल तर एकूण जागापैकी एमबीबीएसमध्ये ४६ तर बीडीएसमध्ये केवळ २२ जागा रिकाम्या राहिल्या आहेत. पहिल्या यादीत राज्यातील एमबीबीएसच्या ८ हजार १३८ जागांपैकी ८ हजार १०६ जागांचे वाटप झाले होते. त्यापैकी केवळ ६ हजार ८४८ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतला. तब्बल १ हजार २५७ विद्यार्थ्यांनी प्रवेश मिळूनही तो नाकारला, तर १ हजार २९१ जागा रिक्त राहिल्या. सरकारी महाविद्यालयांत ४ हजार ९२० जागा होत्या, त्यातील ४ हजार ८८७ जागांचे वाटप झाले. मात्र ४ हजार ४१७ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला, तर ४६९ विद्यार्थ्यांनी प्रवेश नाकारला. खासगी महाविद्यालयांत आता दुसरी फेरीअखेर राज्यातील ८ हजार ३०५ एमबीबीएस जागांपैकी तब्बल ८ हजार २५९ जागांवर प्रवेश निश्चित झाला आहे. केवळ ४६ जागा रिक्त राहिल्या आहेत.

### बिहारमध्ये महिलांच्या खात्यात १० हजार जमा

पाटणा: मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेनुसार बिहारच्या ७५ लाख महिलांच्या खात्यात प्रत्येकी १० हजार रुपयांची रक्कम पाठवण्यात आली. यावेळी बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार देखील उपस्थित होते. यावेळी नरेंद्र मोदी म्हणाले, नवरात्रीच्या या पवित्र दिवसांमध्ये मला बिहारच्या महिला शक्तीसह त्यांच्या आनंदात सहभागी होण्याची संधी मिळाली. नवरात्रीच्या पवित्र पर्वात तुम्हा सर्वांचा आशीर्वाद आमच्या सर्वांसाठी एक मोठी शक्ती आहे. मी तुमचे मनापासून आभार मानतो, असे नरेंद्र मोदी म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बिहार विधानसभा निवडणूक जाहीर होण्यापूर्वी राष्ट्रीय जनता दलावर टीका केली.

### एमपीएससीची पूर्व परीक्षा पुढे ढकलली

पुणे: महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे २८ सप्टेंबरला होणारी संयुक्त पूर्व परीक्षा २०२५ अखेर पुढे ढकलण्यात आली आहे. राज्यात पावसामुळे मराठवाडा तसेच इतर भागात झालेले नुकसान आणि हवामानशास्त्र विभागाने दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. आता ही परीक्षा ९ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील मराठवाडा आणि इतर भागात पूरस्थिती निर्माण झाली आहे. अनेक गावे पाण्याखाली गेल्याने दळणवळणाला फटका बसला आहे. अशा स्थितीत विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचणे हे आव्हानात्मकच होते. ही परीक्षा पुढे ढकलावी अशी मागणी विद्यार्थी संघटना आणि विविध राजकीय पक्षांनी देखील केली होती. अखेर शुक्रवारी दुपारी एमपीएससीने अधिकृत सोशल मीडिया अकाऊंटवरून पत्रक पोस्ट करत परीक्षा पुढे ढकलण्याची घोषणा केली.

### उर्दूला निधी नाही पण जाहिरातीसाठी १० कोटी

पुणे : राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या सुवर्ण महोत्सवाच्या तीन दिवसीय कार्यक्रमाच्या प्रसिद्धीला अल्पसंख्यांक विभागाने मंजूर केलेल्या १० कोटी निधीवर समाजवादी पक्षाचे 'भिवंडी पूर्व'चे आमदार रईस शेख यांनी टीका केली. अकादमीला निधी देताना शासन हात आखडता घेते आणि प्रसिद्धीला मात्र उधळपट्टी करते, हा काय प्रकार आहे, अशी विचारणा आमदार शेख यांनी अल्पसंख्याक विकास मंत्री माणिकराव कोकाटे यांना पत्राव्दारे केली. यासदंर्भात माहिती देताना आमदार रईस शेख म्हणाले की, राज्य उर्दू साहित्य अकादमीला १८ सप्टेंबर रोजी वार्षिक निधी केवळ १ कोटी २० लाख रुपये तर वार्षिक कार्यालयीन खर्चासाठी ७६ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. मात्र अकादमीच्या सुवर्ण महोत्सवी कार्यक्रमाच्या तीन दिवसाच्या प्रसिद्धीला मात्र १० कोटी इतका निधी २५ सप्टेंबर रोजी मंजूर करण्यात आला.

## अग्रलेख

# कोणीही भेटले नाही तरी चालेल पण मदत तात्काळ द्या

राज्य आणि विशेषतः मराठवाड्यावरील पावसाचा कहर थांबायला तयार नाही. ढगफुटी, मुसळधार-कोसळधार अशी विशेषणेदेखील फिकी पडावीत असा पाऊस झोडपत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार आणखी काही दिवस पाऊस धुमाकूळ घालू शकेल. पण, कितीही पाऊस पडला तरी शेतात नुकसान होण्यासारखे काही उरले तरी असेल का? कदाचित पुढचे काही हंगाम पीडित शेतकरी त्यांच्या जमिनीत कोणतेही पीक घेऊ शकणार नाहीत.

उभ्या पिकाची माती भक्क डोळ्याने पाहण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. शेतकरी पिकावर पोटच्या गोळ्याप्रमाणे प्रेम करतो. त्याची काळजी घेतो. तेच मातीमोल झाले आहे. नुकसानीचे माध्यमांमध्ये प्रसिद्ध होणारे वर्णन आणि वेदनांनी भरलेले शेतकऱ्यांचे चेहरे कोणालाही पाहवणार नाहीत. काही शेतकरी इतके हताश झाले आहेत की त्यांनी पाण्याने भरलेल्या शेतात स्वतःला लोटून दिले होते. पिकाबरोबर पाण्यात तेही झोपले. अशा नैसर्गिक आपत्तीच्या काळात पीडित सरकारकडे मोठ्या आशेने डोळे लावतात. सरकारशिवाय कोणीही वाली नाही अशीच सार्वत्रिक भावना निर्माण होणे अत्यंत स्वाभाविक. गंभीरपणे परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे सत्तेचे कारभारी सांगत आहेत. प्राथमिक टप्प्यात सुमारे सव्वादोन हजार कोटींची मदत जाहीर केली आहे. बहुतांश मंत्री मराठवाड्याच्या आणि पावसाचा फटका बसलेल्या जिल्ह्यांच्या दौऱ्यावर आहेत. ते पाहणी करतील आणि शेतकऱ्याचे अश्रू पुसतीलही. तथापि या आपत्तीचा विचार सरकारला कामकाजाच्या ठाशीव चौकटीबाहेर जाऊन करावा लागेल. ज्याला ज्या मदतीची गरज आहे ती दिली जायला हवी. कोरडी सहानुभूती फार तर शाब्दिक समाधान देऊ शकेल, पण आर्थिक गरज भागवू शकत नाही. त्यामुळे कोणीही भेटले नाही तरी चालेल पण आर्थिक मदत मात्र मिळाली पाहिजे, असे शेतकऱ्यांना वाटत असणार. पैशाचे सोंग आणता येत नाही अशी म्हण वापरात आहे. शेतकऱ्यांनाही ते आणता येणार नाही. अशी कोणतीही आपत्ती आली की त्वरित पंचनाम्याचे आदेश दिले जातात. तसे ते आताही दिले गेले आहेत. पण तसे ते तातडीने केले जातील याची दक्षता सरकारने घ्यायला हवी. शेतकऱ्यांना केंद्राकडूनही भरघोस मदत अपेक्षित आहे. केंद्राकडे परिस्थितीचे गांभीर्य मुख्यमंत्री फडणवीस यांनी शुक्रवारी विशद केले आहेच त्यामुळे ही मदत लवकरच जाहीर होईल मात्र ती तात्काळ शेतकऱ्यांच्या हातात आली पाहिजे.

ओला दुष्काळ जाहीर करावा, अशी विरोधी नेत्यांची मागणी आहे, तर शक्य त्या ठिकाणी शक्य ती नियमानुसार मदत सरकार देत आहे, असा खुलासा संबंधितांनी केला आहे. सरकारने किती मदत करावी याविषयी विरोधी पक्षांनी त्यांचे आकडे जाहीर करायला सुरुवात केली आहे तर मंत्री त्यावर प्रतिक्रिया व्यक्त करत आहेत. राजकारण करण्यासारखे अनेक मुद्दे आहेत. शेतकऱ्यांचे अश्रू हा राजकारणाचा मुद्दा बनू नये. ही आपत्ती इतकी भीषण आहे की, सर्वांनी सगळ्या प्रकारचे भेदाभेद आणि राजकारण विसरून एकत्र लढण्याची गरज आहे. तो विवेक सगळे जण दाखवतील का? आपत्ती सरकारी योजना आणि कार्यपद्धतीतील उणिवांवरदेखील बोट ठेवते. उदाहरणार्थ, पीकविम्याच्या अटी खूप जाचक असल्याचे शेतकरी सांगतात. शासकीय भरपाई दर काळानुसार बदलायला हवेत, असे लक्षात आणून देतात. त्याकडे सरकार निदान आता तरी कानाडोळा करणार नाही असे वाटते. पावसाने फक्त पीकच उद्ध्वस्त केले असे नाही तर शेतातील मातीही धुऊन नेली आहे.

असंख्य शेतकऱ्यांनी त्यांचे पशुधन गमावले आहे. पशुधनाच्या नुकसानीचे अंदाज अजून तरी व्यक्त केले गेलेले नाहीत. शिवाय अशी परिस्थिती अनारोग्याचे कारण ठरते ते वेगळेच. ती साथीच्या रोगांना आमंत्रण देते. हीदेखील आपत्तीच आहे. त्याचादेखील सामना करण्याची सज्जता सरकारला ठेवावी लागेल. तात्पर्य, निदान यावेळी तरी सरकार अपेक्षांना खरे उतरेल व पीडितांच्या तोंडाला पाने पुसली जाणार नाहीत याची खबरदारी घेईल, ही आशा.

## अतिवृष्टीमुळे दगावलेल्या पशुधन शेतकऱ्यांच्या खात्यात ६ लाख ९१ हजार जमा

**अंबड । प्रतिनिधी**

**अंबड तालुक्यात अतिवृष्टीमुळे दगावलेल्या पशुधनासाठी ₹६.९१ लक्ष रुपयांची तातडीची मदत; इतर नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिली आहे.**



अंबड तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी आणि वीज पडून झालेल्या घटनांमध्ये बाधित झालेल्या पशुधन मालकांना तातडीने मदत म्हणून एकूण ₹६,९१,५०० (सहा लाख एक्याण्णव हजार पाचशे रुपये) एवढी रक्कम थेट त्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आली आहे. त्याचबरोबर, अतिवृष्टीमुळे झालेल्या घरांची पडझड, जमीन खरडून जाणे व इतर नुकसानीचे पंचनामे युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहेत, अशी माहिती तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी श्री. विजय चव्हाण यांनी दिली. सप्टेंबर महिन्यात तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली होती व विजा पडण्याच्या घटना घडल्या होत्या. या नैसर्गिक आपत्तीमुळे तालुक्यातील १९ शेतकऱ्यांची एकूण २२ लहान-मोठी जनावरे दगावली होती. यामध्ये गाय, म्हैस, बैल आणि शेळ्यांचा समावेश होता. या पशुधन मालकांवर ओढवलेल्या संकट काळात त्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी प्रशासनाने अत्यंत वेगाने कार्यवाही केली. सदर मदत थेट लाभार्थींच्या बँक खात्यात डीबीटी () द्वारे 'मायनस बीडीएस' प्रणालीद्वारे जमा करण्यात आली आहे. श्री. चव्हाण यांनी पुढे माहिती दिली की, पशुधन हानी व्यतिरिक्त इतर नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी तालुक्यातील सर्व कृषी अधिकारी, कृषी सहाय्यक, ग्रामसेवक व महसूल अधिकारी (तलाठी) यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत घरांची पडझड, शेतजमीन खरडून जाणे आणि इतर सर्व प्रकारच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशानुसार, सर्व मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांचे पथक प्रत्यक्ष शेतावर आणि बाधित ठिकाणी जाऊन नुकसानीचे पंचनामे करत आहेत. हे अहवाल तात्काळ तहसील कार्यालयात सादर केले जातील आणि त्यानंतर पुढील कार्यवाहीसाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठवले जातील. शासनाकडून पुढील आदेश व अनुदान प्राप्त होताच, सर्व पात्र लाभार्थ्यांना मदतीचे वाटप करण्यात येईल. सदर पंचनाम्यांच्या प्रक्रियेवर जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारधी यांचे बारकाईने लक्ष असून, मी स्वतः व उपविभागीय अधिकारी प्रत्यक्ष शेताच्या बांधावर जाऊन पाहणी करत आहोत व आवश्यक त्या सूचना देत आहोत. "शेतकऱ्यांवर आलेले हे संकट मोठे आहे आणि प्रशासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, याची प्रशासनाकडून पूर्ण काळजी घेतली जाणार आहे. तसेच एकही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही असे शेवट तहसीलदार यांनी सांगितले.



## जालण्यात डॉ.शेटे कडून विविध हॉस्पिटलमध्ये पाहणी

जालना । प्रतिनिधी

आयुष्यमान भारत समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे हे आज दि२६ सप्टेंबर रोजी जालना दौऱ्यावर आले असता त्यांनी जालना शहरातील विविध हॉस्पिटलमध्ये योजने संदर्भात भेट दिली. एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना, रुग्णालयांची सुसज्जता, तपासणी व लाभार्थ्यांना मिळणारा ल निरिक्षणाबाबत दौरा केला यावेळी संजीवनी हॉस्पिटल नवजीवन हॉस्पिटल व इतर हॉस्पिटलमध्ये डॉ श्री शेटे यांनी भेट दिली. संजीवनी हॉस्पिटल येथे भेट दिली यावेळी जिल्हा शालेय चिकित्स डॉ राजेंद्र पाटील, संजीवनी हॉस्पिटलचे संचालक डॉ बळीराम बागल, डॉ शिवदास मिरकड, नवजीवन हॉस्पिटलचे संचालक डॉ आशिष राठोड, सह्याद्री हॉस्पिटलचे डॉ घोडके, डॉ शालिक जाधव, डॉ अविनाश सुराशे, डॉ विशाल गोयल ,डॉ अतुल काळे, डॉ सचिन सानप, डॉ संजय राख, डॉ भक्कड, डॉ केंद्रे, डॉ काकड, आरोग्य मित्राचे गजानन ढगे, महात्मा फुले योजनेचे डॉ विजय भुतेकर, संजीवनी हॉस्पिटलचे कर्मचारी दत्ता काळे यांच्यासह इतर कर्मचारी होत.

## आज पुन्हा बीड जिल्हा वासियांना आठवण झाली मुंडे साहेबाच्या गोदा परिक्रमा यात्रेची





अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात पावसाने हाहाकार उडाला असुन बीड जिल्ह्यातील शेतकरी वर्ग आस्मानी संकटात सापडला आहे. होत्याचं नव्हतं झालं हाथा तोडांशी आलेला घास निसर्गाच्या कोपामुळे हिरावुन घेतला. अनेक मडंळात ६५ मिली मीटर पेक्षा अधिकचा पाऊस झाला असुन शेतकऱ्यांचे शंभर टक्के पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामध्ये जिल्ह्यातील नदी काठावरील जी गावे आहेत त्या शेतकऱ्यांची संपुर्ण पिके उध्वस्त झाली त्यामध्ये उसाचे पीक पुर्णपणे खाली लोळुन उसाचे पीक नेस्तनाबुत झाले सोयाबीन,मुग ऊडीद सर्व पिके वाहुन गेली अनेक घरे पडली संसार उघड्यावर पडला. अति पुराच्या पाण्याने जमीनीची माती देखील दोन फुट खरडुन गेली हे विदारक चित्र असताना माय बाप शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी बीड जिल्ह्याची लेक महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन आणि पर्यावरण मंत्री लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांनी तातडीने दौरा करून बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेले मंडळे त्यामध्ये बीड मंडल असेल गेवराई तालुक्यातील धोंडराई असेल हिरापुर असेल शिरूर तालुक्यातील मानुर, ब्रम्हणाथ येळंब असेल शिरूर शहरातील व्यापारी पेठ असेल तेथील नुकसान झालेले दुकाने असतील यांची पाहणी व व्यापारी यांच्याशी संवाद साधला तसेच पाटोदा तालुक्यातील भाकरे वस्ती. वैधकिन्ही या सर्व ठिकाणी थेट बांधावर जाऊन माय बाप शेतकऱ्यांना माऊल्या भगीनींना धीर देत खचुन जाऊ नका सरकार तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे कुणालाही मदतीपासुन वंचित ठेवण्यात येणार नाही अशी हमी सरकारच्या वतीने दिली . पण एवढ्यावरच थांबतील त्या ताई कसल्या. दौऱ्यात पंकजाताई यांनी धोंडराई या ठिकाणी एका शेतकऱ्याने मागणी केली ताई तुम्ही माझ्या शेतात चला आणि पहा काहीच राहिले नाही आभाळ फाटलं होत्याचं नव्हतं झालं तेव्हा ते पाहण्यासाठी जायला वाट नव्हती पण पंकजाताईंनी कोणताही बडे जाव पणा न करता कोणताही गाड्यांचा लवा जमा न घेता थेट शेतकऱ्यांच्या बैलगाडीत बसून पाण्यात ओढा ओलांडत कसरत करत थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पाहणी केली त्यावेळी मात्र आठवण झाली ती लोकांना मुंडे साहेबांच्या गोदावरी परिक्रमा यात्रेची. मुंडे साहेबांनी शेतकरी संकटात असताना गोदावरी परिक्रमा केली आणि शेतकऱ्यांना धीर दिला मग मुंडे साहेबाचीच लेक आहे पंकजाताई मागे कशी हटणार. साहेबांच्याच पावलावर पाऊल ठेवून काम करणार मुंडे साहेबांचा दिलेला जनसेवेचा वसा आणि वारसा समर्थपणे चालवण्याचे काम पंकजाताई करत आहेत याची प्रचिती याची डोळा याची देही बीड जिल्ह्यातील जनतेला आली यावरून आज आठवण येते मुंडे साहेबांच्या त्या वाक्याची साहेब म्हणायचे मी पोहोचत नसलो तरी माझा आवाज तुमच्यापर्यंत पोहचेल. साहेब पाहताय ना आपण तुम्ही शरीराने पोहचत नसलात तरी तुमची लेक थेट शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचली आहे.

**ॲड.सुधीर घुमरे**

## पान ६ वरून...

### ना.भुजबळ यांच्या उपस्थितीत

मुंडे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. ओबीसी आरक्षण अखंडित राहावे, ओबीसींच्या लेकरांना आरक्षणाचा लाभ मिळावा, ओबीसी समाजातील लेकरांच्या भवितव्यासाठी आणि ओबीसी समाजाच्या न्याय हक्काच्या मागणीसाठी सदरील महाएल्गार मेळावा होणार असून ओबीसी समाज बांधव, भगिनींनी, युवक, युवती, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन मेळाव्याचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

---------------

### मेळाव्याची तयारी पूर्णत्वाकडे!

रविवारी होत असलेल्या ओबीसी महाएल्गार मेळाव्यासाठी छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणाच्या प्रांगणात ७५ हजार स्केअर फुटाचा भव्य डोम उभारण्यात आला असून पावसाचा अंदाज लक्षात घेता ५०,००० खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी महिलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. मेळाव्यास येणाऱ्या प्रत्येक बंधू-भगिनींसाठी नाष्ट्याची आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. बीड शहरामध्ये ठिकठिकाणी "एकच पर्व ओबीसी सर्व!"असे घोषवाक्य असलेले झेंडे लावण्यात आले असून ठीक ठिकाणी बॅनर्स आणि पोस्टर लावण्यात आले आहेत. ओबीसी महाएल्गार मेळाव्याची तयारी पूर्णत्वाकडे झाली असल्याचे ॲड. सुभाष राऊत यांनी यावेळी सांगितले.

---------------

### रासयो विभागाच्या वतीने

प्राध्यापक बापू घोक्षे डॉ लोखंडे प्राध्यापक नारायण फुने प्राध्यापक पापाजी चव्हाण प्राध्यापक शिवाजीराव काकडे प्राध्यापक शिवाजीराव मोरे प्राध्यापक विनोद कीदक डॉ डॉ सुनील जाधव वंदन जाधव प्राध्यापक प्रवीण शिलेदार सर डॉ प्रधान महाविद्यालयाचे कार्यालय ग्रंथपाल ज्योती रकटे डॉ घारगे मॅडम अधीक्षक श्री चाऊस सर या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

---------------

### कृषी उत्पन्न बाजार

उपसभापती चोले यांनी माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली होती यामध्ये त्यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास आणि नियमन) कायदा, १९६३ चे कलम २३-अ, एपीएमसीच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षांविरुद्ध अविश्वास प्रस्तावाशी संबंधित आहे. उपरोक्त तरतुदीनुसार अध्यक्ष किंवा उपाध्यक्षां विरुद्धच्या बैठकीत अविश्वास प्रस्ताव आणण्याची मागणी करणारी मागणी जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर करावी लागते. अशी मागणी मिळाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत जिल्हाधिकाऱ्यांनी अशा मागणीवर विशेष बैठक बोलावावी अशी तरतूद आहे. सदरील अविश्वास ठराव जिल्हाधिकारी यांच्याकडे दाखल केल्यानंतर ) जिल्हाधिकाऱ्यांनी १२.०९.२०२५ च्या आदेशाने सहकारी संस्थांच्या सहाय्यक निबंधकांना अधिकृत केले आहे असे दिसते, परंतु असे अधिकृतीकरण देण्याची कोणतीही तरतूद दिसत नाही. तसेच सदर अधिकृत अधिकारी-सह-सहायक सहकारी संस्था निबंधकांनी २६.०९.२०२५ रोजी विशेष बैठक बोलावण्यासाठी वादग्रस्त सूचना जारी केली आहे, परंतु सदर विशेष बैठक दिनांकापासून १५ दिवसांपेक्षा जास्त काळ उलटली आहे यासह इतर मुद्दे मांडलेले आहेत. यावर मा. उच्च न्यायालय औरंगाबाद यांनी या याचिकेची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित राहिल्यास, १२.०९.२०२५ च्या वादग्रस्त विशेष बैठकीचे आदेशाची अंमलबजावणी आणि परिणाम स्थगित करा आणि याचिकाकर्त्याविरुद्ध अविश्वास प्रस्तावाच्या विचारार्थ कोणतीही बैठक घेण्यापासून किंवा आयोजित करण्यापासून प्रतिवादींना रोखा असा आदेश दिलेला आहे. त्यामुळे काल दि. २६ सप्टेंबर शुक्रवार रोजी वडवणी बाजार समिती सभागृहात उपसभापती यांच्या विरोधातील विश्वास ठराव संदर्भात आयोजित करण्यात आलेली विशेष बैठक झाली नाही. याचिकाकर्ते उपसभापती अनिलराव चोले यांच्यावतीने ज्येष्ठ विधीज्ञ व्ही. डी. सोळंके, एम व्ही.सोळके यांनी काम पाहिले आहे.

---------------

### नुकसानग्रस्त एकही शेतकरी

पाहणी केली. आष्टी तालुक्यातीलशेडाळा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या वाडी,वस्तीवरील शेती पिकाचे पावसाने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.यामुळे शेतकरी हताश झाला असून पिके हातची गेली आहेत.प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे सुरू आहेत.नुकसानग्रस्त शेतकरी यापासून वंचित राहणार नसल्याचे देखील त्यानी पाहणी अंती सांगितले.आ.सुरेश आण्णा धस याच्या मार्गदर्शनाखाली नुकसानग्रस्त शेती पिकाची यावेळी पाहणी व्हावी व आमदार सुरेश आण्णा धस यांनी जातीने लक्ष देऊन प्रशासनाची कान उघडणी करावी अशी मागणी बाळासाहेब आडसरे व शेडाळा ग्रामस्थांकडून होतं आहे.

---------------

### जीवनात यशस्वी होण्यासाठी

आपल्या प्रेरणादायी भाषणांतून युवकांनी आपले ध्येय निश्चित केले पाहिजे व ते साध्य करण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले पाहिजेत असे मत व्यक्त केले. तरूणांनी व्यसनांच्या आहारी न जाता आपला उत्कर्ष साधला तरच समाजाचा पर्यायाने राष्ट्राचा विकास होवू शकतो. तरूण मनाने खंबीर असेल, प्रयत्नशील असेल तर यशाला गवसणी घालू शकतो. यशाच्या सुरूवातीला प्रचंड संघर्ष असतो. परंतु, एकदा यशाची वाट सुरू झाली की, मग त्याला यु-टर्न नसतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले ध्येय साध्य करण्यासाठी अथक परिश्रम मेहनत घेण्याची तयारी करावी. पालक, शिक्षक हा मार्गदर्शक होऊ शकतो. परंतु, यश साध्य करण्याची आंतर प्रेरणा मात्र त्या व्यक्तीच्या अंतरंगातूनच यावी लागते असे मत डॉ.राजेश इंगोले यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान योगेश्वरी शिक्षण संस्थेचे मार्गदर्शक तथा महाविद्यालयाचे विभागप्रमुख प्रा.माणिकराव लोमटे यांनी भूषविले आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एन.एस.एस.मध्ये सक्रीय सहभागी व्हावे असे आवाहन केले. व्यक्तीमत्वाच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजना हे एक चांगले व्यासपीठ आहे असे मत त्यांनी व्यक्त केले. एन.एस.एस.दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत देशमुख यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयामध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सेवा सुविधांचा लाभ घ्या असे आवाहन प्राचार्यांनी केले. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी डॉ.किरण चक्रे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ.शैलजा बरूरे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रमेश सोनटक्के तसेच गुणवत्ता हमी मंडळाचे सहसंचालक डॉ. ज्ञानेश्वर वडजे, एन.एस.एस.कार्यक्रमाधिकारी डॉ.ज्ञानेश्वर सोनवणे, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी डॉ.इंगोले यांचे प्रेरणादायी व्याख्यान आवडल्याचे सांगत आयुष्याला नवी दिशा आणि नविन ऊर्जा मिळाल्याचे मत व्यक्त केले.

---------------

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांना नव्याने कर्ज

राज्यात अतिवृष्टीने एकीकडे शेती पिकांचे नुकसान झाले आहे. तर दुसरीकडे मात्र बँकांकडून कर्जवसुलीसाठी तगादा लावण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कोंडी झाली आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी कर्जमाफीचा शब्द पूर्ण करावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. परंतु राज्य सरकार मात्र कर्जमाफीसाठी वेळकाढूपणा करत असल्याचे पाहायला मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टी बाधित शेतीपिकांची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांनी तातडीने कर्जमाफी करा, अशी मागणी केली. पण त्यावर मात्र मुख्यमंत्री कर्जमाफीपेक्षा शेतकऱ्यांना सध्या तातडीच्या मदतीची गरज असल्याचे म्हणाले. त्यामुळे राज्य सरकार कर्जमाफीसाठी हालचाल करण्याची शक्यता कमी आहे. दुसरीकडे राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून मात्र गरजू शेतकऱ्यांची कर्जमाफी केली जाणार, अशी ग्वाही दिली जात आहे. त्यामुळे राज्य सरकार शेतकऱ्यांसोबत खेळ खेळतेय का? असा सवाल शेतकरी उपस्थित करत आहेत. राज्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावून घेतला आहे. त्यामुळे शेतकरी कर्जमाफीची प्रतिक्षा करत आहेत. पण मुख्यमंत्री मात्र शेतकरी कर्जमाफीसाठी कोणत्या मुहूर्ताची वाट पाहताहेत, असा सवाल उपस्थित केला जात आहे.

-------------

### अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे

बीड जिल्ह्यातील अतिवृष्टी झालेल्या भागाचा दौरा करण्यासाठी आले होते. यावेळी पत्रकार परिषद घेऊन त्यांनी शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई देण्याची मागणी केली. यावेळी बोलताना आ.जयंत पाटील म्हणाले की, अतिवृष्टीमुळे शेतकरी पूर्णपणे उद्ध्वस्त झाला आहे. मराठवाड्यात बहुतेक ठिकाणी अतिवृष्टी झाली असून सर्वच गावे पाण्याखाली गेली आहेत. जनावरे वाहून गेली आहेत. काही जनावरे जागेवरच दगावली आहेत. शेळ्या - मेंढ्या वाहून गेल्या आहेत. घरामध्ये पाणी शिरल्याने सर्व वस्तू साधने वाहून गेली आहेत. घरे वाहून गेली आहेत. त्यामुळे शासनाने चार पाऊल पुढे येऊन शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करावी. शेतकऱ्यांच्या शिवारात उभे असलेले सोनेरी पीक काही क्षणांत नष्ट झाले. शेतकरी डोळ्यांत अश्रू घेऊन आपला संसार उद्ध्वस्त होताना बघत आहे. सरकारने शेतकऱ्यांना पंचनाम्याच्या प्रक्रियेत अडकवून अधिक मानसिक छळ देण्यापेक्षा सरसकट नुकसान भरपाई द्यावी. आज शेतकरी संकटात आहे. सरकारने केवळ घोषणा न करता तातडीने निर्णय घ्यावा आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा. शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी करण्याची हीच योग्य वेळ असल्याचे जयंत पाटील यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

----------

### लातूर जिल्ह्यात

यंत्रणा सज्ज असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. लातूर जिल्ह्याला यापूर्वीच्या भूकंपाचा इतिहास आहे. १९९३ मध्ये झालेल्या विध्वंसक भूकंपानंतर या परिसरात वेळोवेळी सौम्य भूकंपाचे धक्के जाणवत असतात. त्यामुळे नागरिकांमध्ये अशा घटनेनंतर भीतीचे वातावरण निर्माण होते. तथापि, यावेळी नोंद झालेला भूकंप अत्यंत सौम्य स्वरूपाचा असल्याने कोणत्याही प्रकारची मोठी हानी झालेली नाही. तरीही नागरिकांनी सजग राहून आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

---------

### लढा सुरू ठेवायची की थांबायचा

देण्यासाठी जीआर काढण्यात आला त्याविरुद्ध ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी राज्यभर आंदोलने केली जीआरची होळी केली त्याचबरोबर ओबीसी समाज एकत्र आणण्यासाठी एल्गार मिळावे देखील ठिकठिकाणी घेतले गेले मात्र मध्यंतरी त्यांनी सोशल मीडियावर नाराज असल्याच्या पोस्ट आणि काही फोटो व्हायरल केल्यानंतर ओबीसी नेते आणि कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल सुरू झाली विशेषता बीड येथे रविवारी होणाऱ्या ओबीसी एल्गार मेळाव्याचे निमंत्रण त्यांना दिले गेले नाही यावरून ते नाराज असल्याचे बोलले जात आहेत मात्र आता खुद त्यांनीच सोशल मीडियावर पोस्ट करत आपण शनिवारी होणाऱ्या दैत्य नगर जिल्हा अहिल्यानगर येथील ओबीसी एल्गार मेळाव्यात मी आपली भूमिका जाहीर करणार असल्याचे सांगितले प्रामुख्याने ओबीसीचा लढा ते पुढे चालू ठेवणार की या मेळाव्यानंतर थांबवणार हे ऐकण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व जनतेचे कान या मेळाव्याकडे लागलेले आहेत यासोबतच बीडमध्ये रविवारी होणाऱ्या मंत्री छगन भुजबळ यांच्या उपस्थितीतील ओबीसी मेळाव्याकडे देखील लक्ष लागून आहे एकापाठोपाठ एक असे दोन्ही मिळावे होत असल्याने भुजबळ यांच्या मेळाव्यापूर्वी हाके काय निर्णय घेतात याकडे अधिक लक्ष आहे.

-----------

### अंगणवाडी सेविका व मदतनीसांना २ हजार

करण्यासाठी राज्य सरकारने दिवाळीत दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भाऊबीजेच्या स्वरूपात आर्थिक मदत जाहीर केली आहे. यात प्रत्येक अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना दोन हजार रुपयांची भाऊबीज भेट दिली जाणार असल्याचे तटकरे यांनी सांगितले. यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीस हातभार लागण्यास मदत मिळेल. तसेच, या योजनेसाठी एकूण ४० कोटी ६१ लाख रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांचा दिवाळी सण अधिक आनंदात साजरा होईल, असा विश्वास मंत्री तटकरे यांनी व्यक्त केला.

---------------

### मंत्री पंकजा मुंडेंनी घेतला पूरग्रस्त भागातील

राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकरी हवालदिल झाले आहेत. घराबरोबरच जनावरांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज मंत्रालयात बैठक घेऊन पशुसंवर्धन विभागाला महत्त्वाच्या सूचना दिल्या. यावेळी पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव रामास्वामी एन, पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रविणकुमार देवरे यांच्यासह पूरग्रस्त भागातील प्रादेशिक सह आयुक्त, उपायुक्त हे दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. या आढावा बैठकीत बाधित भागातील जनावरांचे संरक्षण, मृत जनावरांची नोंद, तसेच आवश्यक मदत पुरवण्याबाबत पंकजाताई मुंडे यांनी महत्त्वाचे निर्देश संबंधित यंत्रणांना दिले. यावेळी बोलताना पंकजाताई म्हणाल्या की, राज्यातील अनेक भागांत झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांची मोठ्या प्रमाणात हानी झाली आहे. पूरग्रस्त भागात जिल्हाधिकारी व तहसील कार्यालयाच्या समन्वयाने मृत जनावरांची अचूक संख्या निश्चित करावे. मृत जनावरे/ न सापडलेली जनावरे याची खातर जमा करावी. तहसील कार्यालय व पशुसंवर्धन विभाग यांच्यातील आकडेवारीत तफावत राहू नये, यासाठी काटेकोर पडताळणी करण्यावर भर द्यावा. मृत जनावरांची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावली जात आहे का याची तपासणी करावी. त्यासाठी संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाकडून आवश्यक यंत्रे व मनुष्यबळ उपलब्ध करून घ्यावेत. जनावरांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना यासंबंधी तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश त्यांनी आजच्या बैठकीत दिले. पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, पूर बाधित क्षेत्रात साथीचे रोग पसरू नयेत, यासाठी निर्जंतुकीकरण होणे आवश्यक आहे. त्यासाठी त्या भागात निर्जंतुकीकरणाचे (चुन्याची फक्की / फिनेल / पोटॅशिअम परमॅग्नेट इ.) औषधी फवारुन घेण्यासाठी ग्रामपंचायतीची मदत घेण्यात यावी. रोगप्रतिबंधक लसीकरण प्राधान्याने करण्यात यावे. पशुसंवर्धन विभागाच्या पशुवैद्यकीय दवाखान्यात आवश्यक औषधी/ लस साठा उपलब्ध ठेवण्यात यावे. तसेच आवश्यकता भासल्यास नजीकच्या जिल्ह्यातून औषधी, लस साठा उपलब्ध करुन घेण्यात यावे. पुरामध्ये अडकलेल्या जनावरांचे स्थलांतरण सुरक्षित जागी करण्यात यावे. तसेच बाधित परिसरातील जनावरांसाठी चारा उपलब्ध करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. पशुसंवर्धन विभागाला सर्व आवश्यक मदत जसे की, वाहन उपलब्धता, अतिरिक्त मनुष्यबळ, चाऱ्याची उपलब्धता, जनावरांना तात्पुरते आश्रयस्थान तयार करणे आदींसाठी तत्काळ निधी उपलब्ध करून द्यावा. तसेच पशुसंवर्धन विभागाला आपत्कालीन निधीतून तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. अतिरिक्त मनुष्य बळाची आवश्यकता भासल्यास नजिकच्या जिल्ह्यातून मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित प्रादेशिक पशुसवंर्धन सहआयुक्तांनी पार पाडावी, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

-----------------

### तरुणाच्या खून प्रकरणी युवा सेनेच्या

अटक करावी, या मागणीसाठी शहरातील नागरिक मोठ्या संख्येंने सरकारी दवाखाना आणि शिवाजीनगर पोलिस ठाण्यात रात्री उशिरापर्यंत बसून होते. शुक्रवारी सकाळी मोठा जमाव सरकारी दवाखाना परिसरात जमा झाला आणि त्यांनी इतर आरोपिंवर गुन्हा दाखल करण्यासोबतच त्यांना अटक करण्याच्या मागणीसाठी दवाखाना परिसरात रास्ता रोको आंदोलन केले. गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत अंत्यविधी नाही, अशी भुमिका नागरिकांनी घेतली होती. त्यानंतर पुरवणी जवाब मध्ये आलेल्या नावानुसार शिंदे गटाच्या युवा सेनेचे जिल्हाध्यक्ष शिराळे यांच्यासह चार जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दरम्यान, सायंकाळी पाच वाजता यश ढाका याच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

--------

### त्या लाडक्या बहिणींकडून

आली आहे. यामध्ये मोठ्या प्रमाणावर महिला सरकारी कर्मचाऱ्यांनीच लाभ घेतल्याचे समोर आले. सरकारी कर्मचाऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही. त्याचप्रमाणे वार्षिक अडीच लाख उत्पन्न असलेल्या महिलांनाच या योजनेचा लाभ घेता येईल हे स्पष्ट आदेश असतानाही १५०० रुपयांसाठी सरकारी कर्मचाऱ्यांकडूनच सरकारची फसवणूक झाल्याची बाब प्रशासनाकडून गांभीर्याने घेण्यात आली आहे. माहिती व तंत्रज्ञान विभागाने या सर्व कर्मचाऱ्यांची यादीच महिला व बालकल्याण विभागाकडे सोपविली आहे. यामध्ये जिल्हा परिषद कर्मचारी तसेच शिक्षीकांचाही समावेश आहे. या महिला कर्मचाऱ्यांच्या वेतनातून हे पैसे वळते करण्यात येणार आहेत. त्यांच्या पगारातून टप्प्या टप्प्याने की एकदाच हे पैसे वसूल केले जावेत याबाबत सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागासोबत चर्चा सुरू आहे. महाराष्ट्र दिवाणी नियम १९७९ (आचरण, शिस्त आणि अपील) यानुसार सरकारची फसवणूक केलेल्या महिला कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबतही विचार सुरू असून, नेमकी कोणती कारवाई या कर्मचाऱ्यांवर होते हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

-----------

## थोडक्यात...

### सांगवी पाटण येथे सुवर्ण महोत्सवी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा ७५० वा जन्मोत्सव (सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सव) तसेच ब्रह्मलीन संतश्री महंत शंकरपुरी मंगळपुरी महाराज पुण्यतिथी सुवर्ण महोत्सव सोहळ्याची सुरुवात गुरुवार दि. २ ऑक्टोबर २०२५ रोजी वैराग्यमूर्ती श्री सुदर्शन महाराज यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. हा सोहळा दि. ९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडणार आहे. कार्यक्रमाची सांगता महंत काशीनाथ महाराज शास्त्री यांच्या काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाने होणार आहे.

### गंगामसला गावात पूरपरिस्थितीत सरपंच अविनाश गोंडे यांचा उपक्रम



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गंगामसला गावात मागील पाच दिवसांपासून झालेल्या मुसळधार पावसामुळे गावाची वॉटर सप्लाय पाईपलाईन वाहून गेली.परिणामी ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली होती.या पार्श्वभूमीवर तालुक्यातील मोठेवाडी येथील सरपंच अविनाश गोंडे यांनी तातडीने पुढाकार घेत गंगामसला येथील सर्व ग्रामस्थांसाठी जारद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे तर शेजारील पूरग्रस्त सुरूमगांव, सोमठाणा, सरवर पिंपळगाव, आडोळा, आबेगाव, बोरगाव या गावांना आरोचे पाणी मोफत देण्यात येत आहे. सदर सेवा अखंडितपणे सुरु असून ग्रामस्थांना आवश्यक तो दिलासा मिळत आहे. ग्रामस्थांनी त्यांच्या या सामाजिक बांधिलकीबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले असून, ''भविष्यात गंगामसलेकर त्यांच्या कार्याची नक्कीच उत्तराई करतील'' असे मत सरपंच अविनाश गोंडे यांनी व्यक्त केले आहे.


### मिनिनाथ घुले याचा एमबीबीएसला प्रवेश

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मुळचे कारखेल खुर्द येथील व सध्या म्हसोबाची वाडी येथील रहिवाशी असणारे संभाजी रघुनाथ



घुले यांचे चिरंजीव मिनीनाथ संभाजी घुले हा अत्यंत गरीब कुटुंबातील मुलगा आजोबा ऊसतोडणी कामगार व वडीलांनी देखील ऊस तोडून, ड्रायव्हर म्हणून काम केले आहे व आजही वडील बस चालक म्हणून काम करत आहेत. मिनीनाथ याचे प्राथमिक शिक्षण म्हसोबाचीवाडी येथे झाले असून पुढील शिक्षण वृद्धेश्वर विद्यालय गौखेल येथे झालेले आहे ११/१२वी धानोरा येथे कला वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय धानोरा येथे झाले असून कोणतेही खाजगी क्लास नसताना त्याने अभ्यास करून आपला चा प्रवेश निश्चित केल्याबद्दल त्याचे सर्व शिक्षक बांधव भगिनी व पंचक्रोशीतील बंधू भगिनी व हितचिंतक नातेवाईक यांच्याकडून अभिनंदन आणि पुढील शिक्षणासाठी शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे



बीड : आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मानवतेच्या दृष्टिकोनातून एक मदतिचा हात म्हणून बीड जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी आपले एक दिवसाचे वेतन मुखमंत्री सहाय्यता निधीत देण्यासंदर्भात मा ना श्री अजित दादा पवार उपमुख्यमंत्री व मा जिल्हाधिकारी साहेबांना यांना निवेदन देण्यात आले.यावेळी जिल्हाध्यक्ष पी एस आंधळे, उपाध्यक्ष बंडू आगलावे, कार्याध्यक्ष अनिल तांदळे, अंगद काशीद, शब्बीर पठाण,सचिन एरंडे, कुलकर्णी उपस्तित होते.

# केज तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा, हेक्टरी ५० हजाराची मदत द्या

## ज्येष्ठ नेते रमेश आडसकरांचे तहसीलदारांना निवेदन

केज । प्रतिनिधी

**केज तालुक्यात सततच्या मुसळधार पावसाने सोयाबीन पिकांसह इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून नदी काठच्या गावातील जमिनी पूर्णपणे पिकांसह खरडून गेल्या आहेत. त्यामुळे शासनाने तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून पंचनामे न करता सरगट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) जेष्ठ नेते रमेश आडसकर यांनी तहसीलदारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.**



केज तालुक्यात मागील काही दिवसांपासून सतत मुसळधार पाऊस पडत असून नदी, नाल्यांना पूर येत आहे. शेतात पावसाचे पाणी साचले असून नदीच्या पुराचे पाणी नदी काठच्या गावात आणि जमिनीत शिरले आहे. त्यामुळे नदी काठच्या जमिनी पिकांसह खरडून वाहून गेल्या आहेत. घरांचे नुकसान झाले असून जनावरे ही वाहून गेले आहेत. त्यामुळे पशुधनाची जीवीत हानी झाली आहे. काढणीला आलेले सोयबीन पीक पाणी साचल्याने जाग्यावर सडले असून पूर्णपणे हे पीक हातातून गेले आहे. तर कापुस पिकांचे बोंडे, पाते गळून पडली असून कांदा जाग्यावर सडला आहे. त्याचबरोबर बाजरी, उडीद, मुग ही पिके ही हातातून गेले असून ऊस पिकांच्या सऱ्यामध्ये पाणी साचले असून मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. भाजीपाल्याचे ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सध्याच्या परिस्थितीत पाऊस थांबण्याचे नाव घेत नसून नद्या पाण्याने भरल्याने आता पात्र सोडून वाहत आहेत. तालुक्यातील प्रत्येक गाव अतिवृष्टीने बाधित झाले असून शासनाने कुठल्याही प्रकारचे पंचनामे न करता तात्काळ सर्व शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची अर्थिक मदत देण्यात यावी. तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करून ओल्या दुष्काळातील सर्व प्रकारच्या मदती शेतकऱ्यांना देण्यात याव्यात. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) जेष्ठ नेते रमेश आडसकर यांनी तहसीलदारांकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी बाजार समितीचे सभापती अंकुश इंगळे, माजी उपसभापती ऋषीकेश आडसकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अमर पाटील, शहराध्यक्ष अजहर इनामदार यांच्यासह तालुक्यातील माजी जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सदस्य, सरपंच, उपसरपंच, सदस्य, सेवा सोसायटीचे चेअरमन, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## इनर व्हील क्लब बीडच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त रक्तदान शिबिर

बीड । प्रतिनिधी

नवरात्र उत्सवामध्ये रक्तदान हेच पुण्याचं काम इनरव्हील क्लब बीडच्या महिला सदस्यांनी केले.

माँ वैष्णव पॅलेस या मंगल कार्यालयामध्ये हे रक्त दान शिबिर संपन्न झाले कार्यक्रमाची सुरुवात सर्व सदस्य तथा क्लबचे अध्यक्ष सौ भारतीताई मुंदडा यांनी माँ दुर्गा चे पूजन व दीप प्रज्वलन करून सुरुवात केली.व त्यांनी रक्तदानाचे महत्व खालील प्रमाणे समजून सांगितले.रक्तदानामुळे हृदयविकारांचा धोका कमी होतो, रक्तातील लोहाचे प्रमाण नियंत्रणात राहते, शरीरातील रोगप्रतिकारशक्ती वाढते आणि रक्तगटाची माहिती मिळते. तसेच, मानसिकदृष्ट्याही इतरांना मदत केल्याने आनंद मिळतो आणि ताण कमी होतो. रक्ताचा एक युनिट तीन लोकांचे प्राण वाचवू शकतो, ज्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत आणि गंभीर आजारांमध्ये




रक्त संक्रमणाद्वारे रुग्णांना जीवनदान मिळते. याप्रसंगी अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले या कार्यक्रमाला जीवनदायी ब्लड बँकेचे डॉ.दत्ता आगाव सर व त्यांची संपूर्ण सहकारी उपस्थित होते. आलेल्या सर्व रक्तदात्यांचे काळजीपूर्वक व दक्षतेने रक्तदात्यांशी संवाद करून रक्तदान कार्य पार पाडले हे शिबिर पार पाडण्यासाठी क्लबच्या अध्यक्ष सौ भारतीताई मुंदडा सेक्रेटरी वैशालीताई पाठक, मंगलाताई गुडे विश्वेकर, उषाताई भराडिया, वैशालीताई नहार, संगीता ताई खिवंसरा, स्मिताताई धूत, निर्मलाताई काळे यांनी परिश्रम घेतले आलेल्या सर्व रक्तदात्यांना रक्तदान केल्यानंतर ग्लुकोज वाटर, चहा, फळ, बिस्किट पाणी वितरित करण्यात आले. सर्व सदस्यांनी रक्तदानाचे महत्त्व पटवून दिले व आभार प्रदर्शनाने व सर्व रक्तदात्यांचे आभार मानून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे ब्रीद वाक्य कायम लक्षात ठेवण्यात आले.

## माजलगावमध्ये नवरात्रोत्सव निमित्त सुरेल संगीत मैफिल व त्रिदिवसीय भूअलंकरण

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथे नवरात्रोत्सवानिमित्त संस्कार भारती संयोजन समिती व सिद्धेश्वर महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी सिद्धेश्वर महाविद्यालयाचया सभागृहामध्ये दिंद्रुड येथील प्रसिद्ध गायक गणेश कांबळे यांची सुरेल संगीत मैफिल आयोजित करण्यात आली. त्यांनी पुरिया धनश्री रागातील ''पायलिया झनकार मोरी'' या बंदिशीने




मैफिलीची सुरुवात केली. त्यानंतर ''ओंकार अनादी अनंत'', ''सखी मंद झाल्या तारका'', तसेच ''सूर निरागस हो'', ''तीर्थ विठ्ठल'', ''अंदाज आरशाचा'' यांसारख्या रचनांनी रसिकांची मने जिंकली. यावेळी त्यांना तबल्याची साथ संगत प्रवीण तिवारी यांनी तर हार्मोनियमची साथ संगत शहरातील नामांकित संजय कुलकर्णी यांनी केली.

यावेळी संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाहक विश्वास जोशी, संस्कार भारतीच्या प्रांताध्यक्ष प्रा.स्नेहल पाठक, प्रांत मंत्री प्रमोद वझे यांसह महाविद्यालयाचे प्राध्यापक व मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, नवरात्रोत्सवानिमित्त संस्कार भारती संयोजन समिती कडून शहरात त्रिदिवसीय भूअलंकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शहरातील टेंबे गणपती मंदिर, भाटवडगाव येथील दत्त मंदिर व कदम यांच्या तुळजाभवानी माता मंदिरात आकर्षक रांगोळ्या साकारण्यात आल्या. या उपक्रमात सुरेश देशपांडे, प्रमोद वझे, संगीता संधीकर, मृदुला नवशिंदे, अपर्णा कुलकर्णी यांचा सक्रिय सहभाग होता. सर्व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यात संस्कार भारती संयोजन समिती च्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

## मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी सामाजिक माध्यमांचा वापर कमी करावा -डॉ.अशोक मते

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ अशोक मते अध्यक्ष प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर यांच्या व मार्गदर्शक प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम सर यांच्या मार्गदर्शनाखाली एकदिवशीय कायशाळा आयोजन करण्यात आले समाज माध्यमे आणि मानसिक आरोग्य या विषयावर आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून मा अंबादास जाधव डॉक्टर प्रियंका भोंडवे प्राध्यापक विनोद तीर्थक्षर प्राध्यापक शिवाजीराव काकडे प्राध्यापक बापू गोक्षे व्यासपीठावर उपस्थित होते या कार्यशाळेचे प्रस्ताविक समन्वयक डॉक्टर शिवाजीराव काकडे यांनी केले तर श्री अंबादास जाधव यांनी मानसिक आरोग्य या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले डॉक्टर मते यांनी सामाजिक माध्यमे आणि मानसिक आरोग्य या विषयावर आपले



विचार करताना मानसिक आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांनी समाज माध्यमाचा वापर कमीत कमी करावा असे आवाहन केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ लोखंडे यांनी केले तर आभार प्राध्यापक पापाजी चव्हाण यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राध्यापक नारायण पुणे सौरभते मॅडम प्राध्यापक घेऊन सर प्राध्यापक दिसले सर कार्यक्रमाधिकारी बापू मोक्ष यांनी परिश्रम घेतले.

## रविवारी आष्टीमध्ये आ.सुरेश धस यांच्या हस्ते औदुंबर मेडिकलचे उद्घाटन

आष्टी । प्रतिनिधी

मेडिकल व्यवसायामध्ये अहिल्यानगर येथे मेड लाईफ या नावाने तर कडा येथे संत वामन भाऊ मेडिकल मेडिकल या दोन शाखेनंतर यशस्वी वाटचाल केल्यानंतर जयदीप विठ्ठल नरवडे व सुशांत विठ्ठल नरवडे या दोन युवकांनी आष्टी शहरातील अण्णाभाऊ साठे चौकात आपल्या औदुंबर मेडिकल नावाच्या तिसऱ्या शाखेचे उद्घाटन सोहळा रविवार दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता आयोजित केला आहे औदुंबर मेडिकल चे उद्घाटन मराठवाडा भूषण आमदार सुरेश आण्णा धस माजी मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न होणार आहे या उद्घाटन सोहळ्यास माजी आमदार भीमरावजी धोंडे साहेब माजी आमदार साहेबराव दरेकर नाना माजी आमदार बाळासाहेब आजबे काका, जिल्हा परिषद चे माजी अध्यक्ष डॉ शिवाजीराव राऊत समाजसेवक विजय गोल्हार मामा माजी सभापती बद्रीनाथ जगताप डीवायएसपी बाळकृष्ण हनपुडे पाटील ज्येष्ठ नेते माजी जिल्हा परिषद सदस्य देविदास आबा धस जि प सदस्य सतीश आबा शिंदे भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष लाला भाऊ कुमकर उद्योगपती अण्णा साहेब चौधरी ज्येष्ठ पत्रकार अनंत हंबर्डे सर नगरपंचायतचे नगराध्यक्ष जिया भाई बेग,माजी नगराध्यक्ष रंगनाथ आण्णा धोंडे माजी नगराध्यक्ष भारत भाऊ मुरकुटे माजी जि प सदस्य खंडू दादा जाधव आष्टी तालुका पोलीस निरीक्षक शरद भुतेकर साहेब अहिल्यानगर येथील हृदयरोग तज्ञ डॉक्टर सुदाम जरे कासारी गणेश नाना शिंदे युवा नेते मुर्शदपुर सरपंच अशोक मुळे शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे तालुकाप्रमुख जालिंदर वांढरे नगरसेवक सुनील रेडेकर युवा नेते गणेश नाना मेडिकल असोसिएशन अध्यक्ष संजय वर्धमाने, मनोज खेडकर नगरसेवक अहिल्यानगर विजय पठारे आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा उद्घाटन सोहळा संपन्न होणार आहे या सोहळ्यात उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन विठ्ठल बापूराव नरवडे माझी सहाय्यक पोलीस निरीक्षक, बाबासाहेब मुळीक माझी जी प सदस्य यांनी आवाहन केले आहे.

## श्री क्षेत्र शृंगेरी देवी देवस्थान येथे नवरात्रोत्सव

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील ब्रम्हगाव येथील श्री क्षेत्र शृंगेरी देवी देवस्थान येथे यावर्षीचा नवरात्र उत्सव २०२५ मोठ्या उत्साहात आणि भक्तीभावाने साजरा होत आहे. सोमवार दि.२२ सप्टेंबर रोजी सकाळी ४ वा. देवीचा अभिषेक झाला.सकाळी ११.३० वा. घटस्थापना होऊन नवरात्र उत्सवाला प्रारंभ झाला.या नवरात्र महोत्सवात दररोज सकाळी, दुपारी आणि संध्याकाळी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत महाआरती,कीर्तन, भजन,प्रवचने आयोजित करण्यात आली आहेत.दररोज नामवंत कीर्तनकार व प्रवचनकार भाविकांना अध्यात्मिक ज्ञान देणार आहेत.२२ सप्टेंबर ज्योत स्नान व महाआरती झाली.२४ सप्टेंबर कीर्तनकार प्रा. संदीपान बनसोडे (अहमदपूर) यांचे मार्गदर्शन झाले.

२७ सप्टेंबर उमाकांत बुचके (शिवसेना जिल्हा प्रमुख) व विविध मान्यवरांचा सहभाग असणार आहे. २८ सप्टेंबर आमदार सुरेश धस यांचे मार्गदर्शन होणार आहे.३० सप्टेंबर पारायण समाप्ती व देवी महाआरती होणार आहे.२ ऑक्टोबर पारंपरिक विजयादशमी सोहळा होणार आहे. दि.२८ सप्टेंबर रोजी आ. सुरेश धस यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. या दिवशी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक मंडळाने केले आहे.या नवरात्र महोत्सवाच्या यशस्वी आयोजन श्री शृंगेरी देवी ट्रस्ट व ग्रामस्थ ब्रह्मगाव यांनी केली आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

शारदीय नवरात्र उत्सवाला घटस्थापनेने सुरुवात केली जाते यावेळी तुळजापूर येथून ज्योत आणून देवीची ज्योत पाजाळतात व या उत्सवाची सांगता विजयादशमीच्या दिवशी होते. विजयादशमीच्या दिवशी देवीच्या छबिनाचे ब्रह्मगाव काशेवाडी आंबेवाडी परिसरातून मिरवणूक काढली जाते.

# वडवणीत रेणुका मातेच्या दर्शनासाठी भाविकांचा ओघ

## रविवारी मातेची पालखी मिरवणूक तर गुरुवारी रावण दहन

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी परिसराच्या पंचक्रोशीत नवसाला पावणारी माता म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील भाविक-भक्तांची आराध्यदैवता श्री.रेणुकामाता संस्थान याठिकाणी यंदाही मोठ्या जल्लोषात व हर्षोल्हासात नवरात्रोत्सव साजरा करण्यात येत आहे. सोमवार रोजी घटस्थापनेने या नवरात्रोत्सवास सुरुवात झाली आहे. तसेच रविवार रोजी सातव्या माळेच्या दिवशी मातेची पालखी मिरवणूक मंदिर ते संपूर्ण गाव अशी हलकीच्या व टाळमृदंगाच्या गजरात संपन्न होणार असून गुरुवारी विजयादशमी दिनी सायंकाळी ठीक ७ वाजता मंदिर परिसरात रावण दहनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी व जनतेने उपस्थित राहून या दैदिप्यमान कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मागील वर्षभरापासून वडवणी पंचक्रोशीतील संपूर्ण भाविक भक्तांना ज्या क्षणाची आतुरतेने



ओढ होती प्रतिक्षा होती तो क्षण म्हणजे तमाम वडवणीकरांची अराध्यदैवता श्री.रेणुका मातेच्या मनोभावे दर्शनाची. यावर्षीचा नवरात्र महोत्सव दिनांक २२ सप्टेंबर २०२५ सोमवार रोजी घटस्थापनेपासून सुरु झालेला आहे. या संपूर्ण नवरात्रीमध्ये श्री.रेणुकामाता संस्थान यांच्याकडून मातेची विधिवत पूजाअर्चा व जागर करण्यात येणार असून दैनंदिन देवीचा जागरही करण्यात येत आहे. दरम्यान वडवणी परिसराच्या पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांच्या श्रध्दास्थान असलेल्या तसेच भाविकांच्या नवसाला पावणारी आई म्हणून प्रसिध्द असणाऱ्या वडवणी शहरातील ग्रामस्थांची आराध्यदैवता शहरातील दक्षिणेस चिंचवण रोड या परिसरात निसर्गाच्या हिरव्यागार सानिध्यात वसलेल्या श्री.रेणुकामाता संस्थान या ठिकाणी मातेच्या मनोभावे दर्शनासाठी सध्या नवरात्र महोत्सवादरम्यान भाविक उदंड अशी उपस्थिती दर्शवत आहेत. पहिली माळ असलेल्या सोमवार रोजीपासूनच वडवणी सह परिसरातील भाविकांनी उपस्थित राहून रेणुकामातेचे मनोभावे दर्शन घेतले. दररोजच्या सकाळ व सायंकाळच्या मातेच्या आरतीस देखील भाविकांची उपस्थिती लक्षणीय असते. या नवरात्र महोत्सवाच्या दरम्यान दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रविवार रोजी सातव्या माळेला सायंकाळी ६ वाजता देवीची पालखी मिरवणूक मंदिरापासून ते संपूर्ण गाव अशा स्वरुपात टाळ-मृदंगाच्या, ढोल-ताशांच्या व हलकीच्या गजरात संपन्न होणार आहे. त्याचप्रमाणे दिनांक २ ऑक्टोबर २०२५ गुरुवार रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता विजयादशमी दसरादिनी मंदिर परिसरातील डोंगरावर भव्य असा ३५ फुट उंचीचा रावण दहनाचा कार्यक्रम देखील मान्यवरांच्या शुभहस्ते व हजारो भाविकांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. तसेच दिनांक ६ ऑक्टोबर २०२५ सोमवार रोजी कोजागिरी पौर्णिमेनिमित्त महाप्रसाद दुधाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. तरी याप्रसंगी वरील सर्व कार्यक्रमांस वडवणी पंचक्रोशीतील सर्व भाविक-भक्तांनी व जनतेने उपस्थित राहून या दैदिप्यमान कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन श्री.रेणुकामाता संस्थानाचे संस्थानप्रमुख अण्णा महाराज दुटाळ, राहूल दुटाळ, बाळासाहेब दुटाळ, परशुराम दुटाळ यांनी केले आहे.


### श्री जय महेश महिला नागरी सहकारी पत संस्था मर्यादीत, अंबड

रजि.न.जे.ए.एल./ए.बी.डी./आर.एस.आर./सी.आर./९०१/२८-०५-२०१३

जा.क्रं.श्री.ज.म.म.ना.स.प/वाससनो/ / २०२५ दिनांक ०९/०९/२०२५

**वार्षिक सर्व साधारण सभेची नोटीस (फक्त सभासदा करिता) २०२४-२०२५**

श्री जय महेश महिला नागरी सहकारी पतसंस्था मर्या. अंबड ची वार्षिक सर्वसाधारण सभा वार शनिवार २७-०९-२०२५ रोजी ठिक सकाळी ११.०० वाजता स्व. श्री. बन्सीलालजी राठी व्यापारी संकुल जालना बीड रोड अंबड येथे संस्थापक अध्यक्ष सौ. अर्चना कैलास राठी यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार- विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. संस्थेच्या सर्व सन्माननीय सभासदांनी सभेस अवश्य उपस्थित राहावे हि विनंती.

**वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषय**

१. मागील सर्वसाधारण सभा या सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे २. मा.सचालक मंडळाने सादर केलेल्या संस्थेच्या दिनांक ३१/०३/२०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा कार्याबद्दल अहवाल. वैधानिक मंडळाने सादर केलेल्या ताळेबंद व नफा तोटा पत्रक वाचून मंजुरी देणे ३. सन २०२५-२०२६ च्या अंदाजपत्रकाना मान्यता देणे ४. सन २०२४-२०२५ या वर्षाचे लेखा परिक्षण अहवालाचे वाचन करुन मान्यता देणे ५. संस्थेच्या उपविधी मध्ये दुरुस्ती करणे बाबत व उपविधी मध्ये बदल करणे बाबत. ६. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे व लाभांश जाहीर करणे. ७. सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखा परिक्षणासाठी लेखा परिक्षकाची नेमणुक करणे व लेखा परिक्षण शुल्क ठरविणे. ८. मा. वैधानिक लेखा परिक्षक यांच्या सन २०२४-२०२५ सालाकरीता दोष दुरुस्ती अहवालास मान्यता देणे ९. सुधारीत आदर्श उपविधी स्विकारणे बाबत. १०. विषय क्रमांक १० ते १९ मुळ नोटीस प्रमाणे समाविष्ट आहेत ११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

**सभासदांना विशेष सुचना व विनंती :**

टिप :- १) सभेस आवश्यक असलेली गणपुर्तीसंख्या पुर्ण झाली नाही तर सभा पुढे ढकलली जाईल व सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी एका तासाने (१२.००) वाजता घेण्यात येईल त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही. २) ज्या सभासदाना काही विषेष सुचना करावयाच्या असल्यास त्यांनी तशी लेखी सुचना किंवा अर्ज संस्थेच्या कार्यालयात दिनांक २३/०९/२०२५ सांय ५.०० पर्यंत सादर कराव्यात त्यांनतर आलेल्या तोंडी अगर लेखी सुचनांचा विचार केला जाणार नाही. ३) नजर चुकिने, तांत्रिक दुष्टया अहवालात काही त्रुटी असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सभासंदानी क्षमा करावी.

दिनांक ०९/९/२०२५

मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**लक्ष्मीकांत बालासाहेब अष्टपुत्रे**
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री जय महेश महिला नागरी सहकारी पतसंस्था
मर्या, अंबड ता. अंबड

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
शनिवार दि.२७ सप्टेंबर २०२५
४

# पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी शिक्षक आणि सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांचा मदतीचा हात

पुणे : सोलापूर आणि मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षक आणि सहाय्यक कृषी अधिकारी पुढे सरसावले आहेत. त्यांनी एका दिवसाच्या पगाराची रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीला देण्याचा निर्णय घेतला आहे. मुसळधार पावसामुळे शेतजमिनी, पिके आणि पशुधनाचे मोठे नुकसान झाले असून, शेतकऱ्यांवर उदरनिर्वाहाचे संकट कोसळले आहे. या कठीण काळात शिक्षक आणि कृषी अधिकाऱ्यांचा हा पुढाकार पूरग्रस्तांना दिलासा देणारा ठरणार आहे.

सहाय्यक कृषी अधिकारी आणि शेतकरी यांच्यात नेहमीच एक भावनिक बंधन असते. ते शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेण्यास आणि त्यांना मदत करण्यास तत्पर असतात. सध्या पूरामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम हे अधिकारी वेगाने करत आहेत. त्याचबरोबर, शेतकऱ्यांना आर्थिक आधार देण्यासाठी त्यांनी एका दिवसाचे वेतन देण्याचा निर्णय घेतला आहे. या संघटनेचे अध्यक्ष विलास रिंढे यांनी सांगितले की,



आम्ही फक्त कागदोपत्री काम करत नाही, तर शेतकऱ्यांच्या दुःखात सहभागी होतो. हे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीला दिले जाईल, ज्यामुळे पूरग्रस्तांना थेट फायदा होईल. दुसरीकडे, प्राथमिक शाळेतील शिक्षकांनीही पूरग्रस्तांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. त्यांनीही एका दिवसाचे वेतन देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. हे शिक्षक म्हणतात की, ही मदत म्हणजे आमचा छोटासा हिस्सा आहे, पण पूरग्रस्तांच्या दुर्दशेत आम्ही त्यांच्याबरोबर आहोत. महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक मध्यवर्ती संघटनेचे राज्याध्यक्ष केशवराव जाधव यांनी हे पत्र मुख्यमंत्री कार्यालयात सादर केले आहे. राज्यातील पूरस्थितीचा सामना करण्यासाठी सरकारही सक्रिय आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी शिक्षकांच्या या मदतीचा उल्लेख करून त्यांचे कौतुक केले आहे. तसेच, कृषिमंत्री भरणे यांनी सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांच्या योगदानाचे आभार मानले आहेत.

महाराष्ट्रात यंदा अनेक जिल्ह्यांत मुसळधार पाऊस पडला, ज्यामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहू लागले आणि पूर आला. याचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांना बसला आहे. घरदार, शेती आणि जनावरे सगळे काही वाहून गेले. या संकटातून बाहेर काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री विविध जिल्ह्यांत दौरे करत आहेत.

## जनावरांना साप चावला तर लगेच करा हा उपाय, वाचू शकतो जीव



सध्या पावसाळा सुरू आहे. पावसाळ्यात साप मोठ्या बाहेर पडताना दिसतात. याशिवाय साप, विंचू, डास व इतर किटकांचा प्रादुर्भाव सुद्धा या दिवसांत वाढताना दिसतो. अशा परिस्थितीत मानव शक्य ती सर्व खबरदारी घेऊन स्वत:ला सुरक्षित ठेवतो, परंतु गरीब मुक्या प्राण्यांना या समस्यांना तोंड द्यावे लागते.

सर्पदंशामुळे अनेक प्राण्यांचा मृत्यूही होतो. यासाठी त्यांची काळजी घेण्याची गरज आहे. पाळीव प्राणी असल्यास किंवा पशुपालन करत असल्यास. जर तुमच्या प्राण्याला विषारी साप चावला असेल तर घाबरू नका, वेळीच योग्य ती पावले उचलून प्राण्याला वाचवू शकता. अशा स्थितीत आधी कोणत्या ठिकाणी साप चावला आहे. याचा शोध घ्या. त्या भागाच्या ३ इंच वर पातळ ताराने घट्ट बांधा. बांधल्यानंतर, सर्पदंशावर ब्लेडने अत्यंत काळजीपूर्वक एक चीरा बनवा. चीरातून रक्तासोबत सापाचे विषही शरीरातून बाहेर पडेल. लक्षात ठेवा की फक्त चीर बनवायची आहे, जनावराची कातडी कापू नका. चुकूनही कातडी कापली गेली तर जास्त रक्तस्त्राव होऊन त्याचा मृत्यू होऊ शकतो. प्रक्रियेदरम्यान, प्राणी एक संवेदनशील आणि कमकुवत स्थितीत आहे, म्हणून त्याला शांत वातावरणात आणि त्याच ठिकाणी ठेवा. या संपूर्ण प्रक्रियेदरम्यान एखाद्याला पशुवैद्याला कॉल करण्यासाठी पाठवा. डॉक्टर वेळेवर येऊन जनावराला विषाचा उतारा देतील. अशा प्रकारे प्राण्यांचे प्राण वाचू शकतात. पावसाळ्या प्राण्यांची विशेष काळजी घ्यावी लागते. शक्यतो जनावरांना उघड्यावर न बांधता स्वच्छ व हवेशीर खोलीत ठेवा. त्यांच्या चाऱ्याची वेळोवेळी व्यवस्था करा आणि पशुवैद्याचा सल्ला घेत राहा जेणेकरून जनावरे निरोगी राहतील. जनावरांचा परिसर स्वच्छ असल्यास विषारी प्राणी व डास येण्याची शक्यता कमी असते. त्यामुळे प्राणी सुरक्षित राहू शकतात.

## पिकांसाठी निंबोळी अर्काचा वापर; कीटकनाशक खर्चात होते २५ टक्के कपात!

खरीप हंगामात पिकांवर किडींचा प्रादुर्भाव वाढल्यानंतर कीटकनाशकांची फवारणी वारंवार करावी लागते. कीटकनाशकांच्या किमती वाढल्यामुळे शेतकऱ्यांचा बराच खर्च वाढतो. हा उत्पादन खर्च टाळण्याकरिता शेतकऱ्यांनी निंबोळी अर्काचा वापर करणे गरजेचे असते. त्याकरिता सध्याच्या रिकाम्या दिवसांमध्ये उन्हाळ्यातच निंबोळी गोळा करून ठेवण्याची आवश्यकता आहे.

खर्चात २०-२५ टक्क्यांपर्यंत बचत : पिकलेल्या व जमिनीवर पडलेल्या निंबोळ्या गोळा करून, चांगल्या वाळवून, कोरड्या जागेत साठवाव्यात. ५ टक्के निंबोळी अर्काची २ हेक्टर कपाशी, तूर, हरभरा पिकांवर दोनवेळा फवारणी केल्यास रासायनिक कीटकनाशकांच्या खर्चात २० ते २५ टक्क्यांपर्यंत बचत होते. तसेच पेरणीपूर्वी सर्व बियाण्यांची उगवणशक्ती घरीच तपासावी, बियाण्याची उगवण क्षमता ७० ते ८० टक्क्यांपर्यंत असल्यास पेरणीसाठी बियाणे वापरावे. निंबोळी अर्काच्या वापरामुळे हेक्टरी झाडांची योग्य संख्या राहून, चांगले उत्पादन मिळते. माती परीक्षण अहवालाच्या शिफारशीनुसार रासायनिक खतांच्या मात्रा द्याव्यात. त्यामुळे रासायनिक खतांच्या मात्रेत बचत करता येईल.

असा तयार करतात निंबोळी अर्क : ५ किलो निंबोळया गोळा करून त्या सावलीत वाळवाव्यात आणि फवारणीच्या १ दिवस अगोदर त्या कुटुन बारीक कराव्यात आणि ९ लिटर पाण्यात रात्रभर भिजु घालावे.

तसेच २०० ग्रॅम साबणाचा चुरा किंवा वॉशिंग पावडर १ लिटर पाण्यात वेगळा भिजत घालावा. दुसऱ्या दिवशी सकाळी लाकडी काठीने ते द्रावण दुधासारखे दिसेपर्यंत ढवळावे. द्रावण ढवळुन झाल्यावर निंबोळी अर्क स्वच्छ पातळ कापडाने गाळुन घ्यावे आणि त्यात साबनाचे द्रावण मिसळावे, अशा रीतीने निंबोळीचा ५ टक्के अर्क तयार होतो. हा सर्व अर्क १०० लिटर होईल एवढे पाणी टाकावे व फवारणीसाठी वापरावे.

निंबोळी अर्क वापरण्याचे फायदे : निंबोळी खर्च अत्यल्प असतो. नैसर्गिक असल्याने प्रदूषण होत नाही. निंबोळी अर्क बनवणे. हाताळने व वापरणे सोपे आहे. घातक किडींना प्रतिबंध, नियंत्रित करीत असले तरी नैसर्गिक शत्रू, मित्र किटकांसाठी फारसे हानीकारक ठरत नाही. रासायनिक कीटकनाशकांचा द्वारे होणारे दुष्परिणाम टाळून पर्यावरणाचा समतोल टाळता येईल. निंबोळी अर्क / पेंड वापरल्यामुळे जमिनीतील सुत्रकृमी, मुळे कुरतडणाऱ्या अळ्या नियंत्रित होतात.



## कोबी व फूलकोबी लागवड तंत्र

कोबी व फुलकोबी ही थंड हवामानात येणारी पिके आहेत. महाराष्ट्रामध्ये जवळ जवळ सर्व जिल्हयात या पिकाची लागवड केली जाते. महाराष्ट्रामध्ये कोबी पिकाखाली अंदाजे ७२०३ हेक्टर क्षेत्रावर लागवड केली जाते. तर फुलकोबी या पिकाखाली अंदाजे ७००० हेक्टर क्षेत्रावर लागवड केली जाते. या पिकांमध्ये फॉस्फरस, पोटॅशियम, सल्फर, चुना, सोडीयम, लोह ही खनिज द्रव्ये असून अ ब क ही जीवनसत्वे मुबलक प्रमाणात असतात. त्यामुळे या भाजीपाला पिकांना आहारात महत्व आहे.

हवामान : या पिकांना हिवाळी हवामान मानवते. सर्वसाधारणपणे १५ ते २० अंश सेल्सिअस तापमान वाढीस पोषक असते. फूलकोबीच्या जाती तापमानाच्या बाबतीत अधिक संवेदनशील असल्यामुळे त्यांची निवड त्या त्या हवामानाच्या गरजेनुसार करावी.

जमीन : रेताड ते मध्यम काळी निच-याची जमीन या पिकास लागवडीस योग्य आहे. जमिनीचा सामु ५.५ ते ६.६ च्या दरम्यान असावा.

पूर्वमशागत : जमिनीची उभी आडवी नांगरट करून कुळवाच्या पाळया देऊन ढेकळे फोडून जमिन भुसभुशित करावी. जमिनीत२० ते ३० टन हेक्टरी या प्रमाणात शेणखत मिसळावे. जमीनी सपाट करून या भाज्यांच्या लवकर व उशिरा येणा-या जातींच्या लागवडीस अनुसरून अनुक्रमे ४५ व ६० सेमी अंतरावर स-या तयार करून घ्याव्यात. कोबी या पिकाची लागवड सपाट वाफयावर सुध्दा केली जाते. त्याकरिता जमिनीच्या उताराप्रमाणे योग्य अंतरावर वाफे तयार करावेत.

लागवडीचा हंगाम : या पिकांची लागवड



सप्टेबर, आक्टोबर महिन्यात करतात.

बियाण्याचे प्रमाण : हेक्टरी ०.६०० ते ०.७५० किलो बियाणे लागते. पेरणीपुर्वी बी गरम पाण्यात ५० अंश सेल्सिअस तापमानास अर्धा तास किंवा स्ट्रेप्टोसायक्लीन च्या १०० पीपीएम द्रावणात २ तास बुडवावे. व नंतर बी सावलीत सुकवावे.

लागवड : या पिकाची रोपे गादी वाफयावर तयार करतात. वाफयाच्या रूंदीस समांतर १२ ते १५ सेमी अंतरावर रेषा ओढून बियाणे पातळ पेरावे व बियाणे मातीने अलगद झाकावे. बियांची उगवण होईपर्यंत झारने पाणी द्यावे. बी पेरल्यापासून ४ ते ५ आठवडयात रोपे लागवडीस तयार होतात. लागवडीपूर्वी सरी वरंबे अथवा वाफे यांना खतांचा मात्रा द्यावी. लवकर येणा-या जातींकरीता ४५ बाय ४५ सेमी वर तर उशिरा येणा-या जातींना ४५ बाय ६० सेमी किंवा ६० बाय ६० सेमी अंतरावर लागवड करावी. रोपांची लागवड करण्यापूर्वी रोपे १० लिटर पाण्यात ३६ इसी मोनोक्रोटोफॉस टाकून या द्रावणात बुडवून घ्यावी.

खते व पाणी व्यवस्थापन : कोबी पिकास लागवडीपूर्व ८० किलो नत्र ८० किलो स्फूरद व ८० किलो पालाश द्यावे व लागवडीनंतर १ महिन्याने ८० किलोचा नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. तसेच फुलकोबीसाठी ७५ किलो नत्र ७५ किलो स्फूरद आणि ७५ किलो पालाश द्यावे. लागवडीनंतर १ महिन्याने ७५ किलो नत्राचा दुसरा हप्ता द्यावा. लागवडीनंतर तिसऱ्या दिवशी आाणि नंतर पुरेसा ओलावा राहील. अशा अंतराने जमिनीचा मगदूर पाहून पाण्याचा पाळया द्याव्यात. कोबी व फूलकोबीचे गडडे निघू लागल्यापासून गडडयांची वाढ होईपर्यंत भरपूर पाणी द्यावे व नंतर हलकेसे पाणी द्यावे.आंतरमशागत : शेत २ ते ३ खुरपण्या देऊन तणविरहीत करावे. खुरपणी करताना रोपांच्या बुंध्याशी मातीचा आधार द्यावा म्हणजे रोपे कोलमडत नाही व रोपांची वाढ चांगली होते. फूलकोबीच्या गडडयांची पांढरी शुभ्र प्रतीक्षा तयार होण्याकरिता गडडे काढणीपूर्वी १ आठवडाभर गडडयाच्या आतील पानांची झाकून घ्यावे. त्यामुळे सूर्यप्रकाशामुळे होणारी हानी टाळली जाते.

किड व रोग : कोबीवर्गीय भाज्यांना मावा तुडतुडे फूलकिडे कोबीवरील अळी कॅबेज बटर फलाय असे विविध किडींचा तसेच ब्लॅक लेग, क्लब रूट, घाण्या रोग, रोपे कोलमडणे, लिफ स्पॉट या रोगांचा प्रादुर्भाव होतो. किडींच्या बदोबस्तासाठी रोपवाटीकेतील रोपांपासून ते लागण झालेल्या भाज्यांवर एन्डोसल्फान ३५ सीसी २९० मिली किंवा फॉस्फोमिडॉन ८५ डब्ल्यू एस सी ६० मिली किंवा मॅलेथिऑन ५० सीसी २५० मिली २५० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फवारावे. किडी व रोगाचे एकत्रितरित्या नियंत्रण करण्यासाठी मॅलॅथिऑन ५० सीसी ५०० मिली अधिक कॉपर ऑक्झक्लोराईड ५० डब्ल्यूपी १०५० ग्रॅम्? किंवा डायथेम एम ४५, ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारावे. वरील किटक नाशकांच्या २ ते ३ फवारण्या १० ते १२ दिवसांच्या अंतराने कराव्यात.

काढणी व उत्पादन : जातीपरत्वे कोबी साधारण ३ महिन्यात तयार होतो. तयार गडडा हातास टणक लागतो. तयार गडडा जादा काळ तसाच ठेवला तर पाणी दिल्यावर तो फूटून नुकसान होण्याचा संभव असतो. म्हणून तो वेळीच काढून घ्यावा. फूलकोबी चा गडडा पिवळसर पडण्यापूर्वी काढावा. कोबीचे २०० ते २५० क्विंटल तर फूलकोबीचे १०० ते २०० क्विंटल हेक्टरी उत्पादन घेता येते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

४६ : ज्युलियस सीझर यांनी आपल्या पौराणिक पूर्वज व्हिनस गेनेटिक्स यांना एक मंदिर अर्पण केले.
१७७७ : अमेरिकन क्रांती ब्रिटिश सैनिक फिलाडेल्फिया शहरात घुसले.
१९०५ : अल्बर्ट आइनस्टाइन यांनी सापेक्षतावादाचा विशेष सिद्धांतावरील पहिला लेख प्रकाशित केला.
१९१० : त्रावणकोर सरकारवर केलेल्या टीकेमुळे भारतीय पत्रकार स्वदेशभीमानी रामकृष्ण पिल्लई यांना अटक करून हद्दपार करण्यात आले.
१९५० : इंडोनेशियाचा संयुक्त राष्ट्रात प्रवेश
१९५४ : जपानमध्ये तोया मारू ही फेरी वादळात बुडाली. १,१७२ लोक मृत्युमुखी.
१९६० : फिडेल कॅस्ट्रोने यु. एस. एस. आर. ला पाठिंबा जाहीर केला.
१९७३ : ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणार्या 'काँकॉर्ड' या विमानाने अटलांटिक महासागर न थांबता विक्रमी वेळात पार केला.
१९८४ : युनायटेड किंगडमने हाँगकाँगच्या हस्तांतरणास मान्यता दिली.
१९९० : रंगनाथ मिश्रा यांनी भारताचे २१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९७ : गरुडा इंडोनेशियाचे विमान मेदान शहराजवळ कोसळले, २३४ लोक ठार.
२००१ : सकाळ वृत्तपत्राचे व्यवस्थापकीय संपादक संचालक प्रताप पवार यांची इंडियन न्यूजपेपर सोसायटीच्या अध्यक्षपदी निवड.
२००९ : टायफून केत्साना या चक्रीवादळाच्या तडाख्यात फिलिपाईन्स, चीन, व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस व थायलंडमध्ये ७०० लोक मृत्युमुखी.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२० : इश्वरचन्द्र विद्यासागर बंगाली समाजसुधारक, तत्त्वज्ञ, लेखक, शिक्षणतज्ञ व उद्योजक. यांच्या प्रयत्नांमुळेच १८५६ मधे विधवा विवाहाचा कायदा आला. (मृत्यू: २९ जुलै १८९१)
१८४९ : इव्हान पेट्रोव्हिच पाव्हलॉव्ह चयापचय प्रक्रियेविषयी महत्त्वाचे संशोधन करणारे नोबेल पारितोषिक विजेते (१९०४) रशियन शास्त्रज्ञ (मृत्यू: २७ फेब्रुवारी १९३६)
१८५८ : मणिलाल नथुभाई त्रिवेदी गुजराथी साहित्याच्या पंडितयुगातील एक अष्टपैलू लेखक, आर्यसंस्कृतीचे व शंकराचार्यप्रणित अद्वैत वेदांताचे कडवे पुरस्कर्ते (मृत्यू: १० आक्टोबर १८९८)
१८७० : डेन्मार्कचा राजा क्रिस्चियन (दहावा) यांचा जन्म.
१८७६ : भारतीय कवी, वकील, आणि राजकारणी गुलाम कबीर नैयरंग यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑक्टोबर १८५२)
१८८८ : टी. एस. इलियट अमेरिकेत जन्मलेले ब्रिटिश कवी, नाटककार, टीकाकार आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ४ जानेवारी १९६५)
१८९४ : आचार्य शंकर दत्तात्रेय जावडेकर लेखक व गांधीवादी तत्त्वचिंतक (मृत्यू: १० डिसेंबर १९५५)
१९०९ : नासकार चे संस्थापक बिल फ्रान्स सीनियर यांचा जन्म. (मृत्यू: ७ जून १९९२)
१९१८ : मिस वर्ल्ड चे संस्थापक एरिक मॉर्ली यांचा जन्म. (मृत्यू: ९ नोव्हेंबर २०००)
१९२३ : देव आनंद चित्रपट अभिनेता व निर्माता (मृत्यू: ३ डिसेंबर २०११)
१९२७ : गेटोरेडे चे सह-संशोधक रॉबर्ट कड यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर २००७)
१९३१ : विजय मांजरेकर क्रिकेटपटू (मृत्यू: १८ आक्टोबर १९८३)
१९३२ : डॉ. मनमोहन सिंग भारताचे १३ वे पंतप्रधान, अर्थतज्ञ?
१९४३ : इयान चॅपेल ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट कप्तान
१९७२ : न्यू झीलँडचा क्रिकेट खेळाडू मार्क हॅस्लाम यांचा जन्म.
१९८१ : सेरेना विल्यम्स अमेरिकन लॉन टेनिस खेळाडू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०२ : लेव्ही स्ट्रॉस अमेरिकन उद्योजक (जन्म: २६ फेब्रुवारी १८२९)
१९५२ : स्पॅनिश तत्त्वज्ञानी जॉर्ज सांतायाना यांचे निधन.
१९५६ : लक्ष्मणराव किर्लोस्कर किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (जन्म: २० जून १८६९)
१९७७ : उदय शंकर जागतिक कीर्तीचे नर्तक व नृत्यदिग्दर्शक, पद्मविभूषण (१९७१), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९६२) व फेलोशिप विजेते. त्यांनी अल्मोडा येथे 'इंडिया कल्चरल सेंटर'ची स्थापना केली. (जन्म: ८ डिसेंबर १९००)
१९८८ : पण्डित शिवरामबुवा दिवेकर हिन्दगंधर्व (जन्म: १ एप्रिल १९१२)
१९८९ : हेमंतकुमार गायक, संगीतकार आणि निर्माता (जन्म: १६ जून १९२०)
१९९६ : विद्याधर गोखले नाटककार व संपादक (जन्म: ४ जानेवारी १९२४)
२००२ : राम फाटक गायक व संगीतकार (जन्म: २१ आक्टोबर १९१७)
२००८ : पॉल न्यूमन अभिनेता, दिग्दर्शक व रेस कार ड्रायव्हर (जन्म: २६ जानेवारी १९२५)
२०२० : इशर जज अहलुवालिय भारतीय अर्थशास्त्र (जन्म: १ ऑक्टोबर १९४५)

cmyk

राज्य
लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

शनिवार दि. २७ सप्टेंबर २०२५ ५

# आ.रोहित पवार शेतकऱ्यांच्या बांधावर

## सरसकट पंचनाम्याच्या सूचना, जीवनावश्यक वस्तूंचे केले वाटप

कर्जत। प्रतिनिधी

कर्जत तालुक्यातील अतिवृष्टीमुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर आमदार रोहित पवार थेट पोहोचले. बेलगाव, मिरजगाव, रवळगाव, कोकणगाव, निमगाव गांगर्डा, गुरवपिंपरी, होलेवाडी, परीटवाडी, करपडी आदी गावांमध्ये गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसाने व सीना नदीच्या पुरामुळे शेतजमिनी वाहून गेल्या, शेतातील उभे पीक पूर्णपणे नष्ट झाले असून शेतकरी बांधवांवर जगण्याचा प्रश्न उभा राहिला आहे. या भीषण परिस्थितीत आमदार पवार यांनी थेट शेतकरी कुटुंबांची भेट घेऊन त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या, धीर दिला व तातडीच्या जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून संकटात खंबीरपणे उभं राहण्याचे आवाहन नागरिकांना केले.

आमदार रोहित पवार यांनी वाडी-वस्त्यांवर नुकसान झालेल्या शेतात चिखलातून, पाण्यातून वाट काढत शेतीपिकाच्या नुकसानीची पाहणी केली. ज्या ठिकाणी शेतात थेट पोहोचणं शक्य नव्हतं, तिथे त्यांनी नागरिकांसोबत ट्रॅक्टरवरून प्रवास करत शेतात जाऊन थेट नुकसानीचा आढावा घेतला. शेतकऱ्यांच्या डोळ्यांतले अश्रू, रिकाम्या शिवारातली वेदना आणि भविष्यातील काळजी याची जाणीव करून घेत त्यांनी नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना तातडीने दिलासा देण्यासाठी हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत देण्याची ठाम मागणी राज्य सरकारकडे केली. ''आज शेतकरी फक्त पिकाच्या नव्हे तर जगण्याच्या संघर्षात आहे. घोषणांनी नाही, तर रोख मदतीने त्याला उभारी द्या, हेच खरं सरकारचं कर्तव्य आहे,'' अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. या वेळी पंचनामे करत असलेल्या तलाठी व कृषी सहाय्यक अधिकाऱ्यांशी चर्चा करत सरसकट व न्याय्य पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या. ''सरकार कितीही पैसे दिले तरी वाहून गेलेली माती शेतकरी आणणार कुठून? आणि यापुढे शेती करायची कशी?'' असा थेट सवाल करून त्यांनी सरकारचं लक्ष वेधले. याचबरोबर त्यांनी अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे उभं राहिलेले संकट दूर करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करत त्यांनी शेतकरी बांधवांना खंबीर राहण्याचं आवाहन केलं. या वेळी स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### हेक्टरी ५० हजार मदतीची मागणी

नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना तातडीने दिलासा मिळावा म्हणून आमदार रोहित पवार यांनी सरकारकडे ''सरसकट हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी'' अशी ठाम मागणी केली. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, आज शेतकरी फक्त पिकाच्या नाही तर जगण्याच्या संघर्षात आहे. घोषणांनी नाही तर रोख मदतीने त्याला उभारी द्या, हेच खरं सरकारचं कर्तव्य आहे.

# अतिवृष्टीग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही–दादाजी भुसे

## हिंगोली जिल्ह्यात नुकसानीची केली पाहणी



हिंगोली। प्रतिनिधी

जिल्ह्यात सतत पडलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर शेती पिकांचे व आर्थिक नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे प्रतिपादन शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केले. त्यांनी सेनगांव तालुक्यातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशीही संवाद साधला.

यावेळी आमदार डॉ. प्रज्ञाताई सातव, आमदार संतोष बांगर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, पोलिस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ, जीवककुमार कांबळे, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी आदींसहीत शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या पाहणी दौऱ्यात शिक्षणमंत्री भुसे यांनी हिंगोली तालुक्यातील कन्हेरगाव नाका, आंबाळा, माळहिवरा, भिरडा, कळमनुरी तालुक्यातील डोंगरगाव पूल या गावांना भेट दिली. तसेच त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती घेतली. शेतकऱ्यांनी शिक्षणमंत्री भुसे यांच्यासमोर सोयाबीन, कापूस, तूर आदी हानी झालेली पिके दाखवत वास्तव चित्र मांडले. शिक्षणमंत्री भुसे यांनी यावेळी तातडीने पंचनामे पूर्ण करून अहवाल पाठविण्याचे निर्देश दिले. तसेच शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाच्या विविध मदत योजनांतर्गत कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

# अतिक्रमणात घर जाण्याच्या चिंतेने तरुण शेतकऱ्याने संपवले जीवन

## नातेवाइकांचा मृतदेहासह चिकलठाण्याच्या चौकात ठिय्या



छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

मनपाच्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे घर सोडावे लागलेल्या एका तरुण शेतकऱ्याने मळ्यात गळफास घेतल्याने संतापलेले नातेवाईक आणि गावकऱ्यांनी त्याच्या मृतदेहासहित चिकलठाण्याच्या चौकात ठिय्या आंदोलन केले. अडीच तास चाललेल्या या आंदोलनामुळे जालना रोडच्या दोन्ही बाजूंनी वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या.

मृताच्या नातेवाईकाला नोकरी, आर्थिक मदत या प्रमुख मागण्या मान्य केल्याशिवाय हटणार नाही, असा पवित्रा नागरिकांनी घेतल्याने तणाव निर्माण झाला. अखेर पोलिस प्रशासन आणि नागरिकांशी चर्चा केल्यानंतर नागरिकांनी मृतदेह घरी नेला. त्यानंतर तणाव कमी झाला आणि वाहतूक सुरळीत झाली.

तरीही या भागात पोलिस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. चिकलठाणा परिसरातील महादेव गल्लीत राहणारा तरुण शेतकरी राजेश्वर साईनाथ नवपुते ऊर्फ गोटे (वय ३०) याने गळफास घेऊन आत्महत्या केली. दोन महिन्यांपूर्वी महापालिकेने त्याच्या तीन मजली इमारतीच्या अतिक्रमण कारवाईसंदर्भात नोटीस दिली होती. तेव्हापासून तो तणावाखाली होता. या धक्क्यातून सावरू न शकल्यानेच त्याने टोकाचा निर्णय घेतल्याचे नातेवाइकांनी सांगितले.

राजेश्वर रोज सकाळी आठच्या सुमारास मळ्यातून दूध घेऊन घरी परतायचा. गुरुवारी तो नेहमीच्या वेळेत आला नाही. यामुळे घरच्यांना शंका आली. त्याचा पुतण्या धावत गेला आणि घरात पाहणी केली असता राजेश्वरने दोरीने गळफास घेतल्याचे दिसून आले.

हा प्रकार समजताच कुटुंब व शेजारी धावून आले. राजेश्वरच्या पश्चात आई-वडील, पत्नी, आजी आणि तीन महिन्यांचा मुलगा असा परिवार आहे.

# पवनचक्कीसाठी खोदलेल्या खड्ड्यातील पाण्यात बुडून शेतकऱ्याचा मृत्यू; तीन दिवसांनी सापडला मृतदेह

लातूर। प्रतिनिधी

औसा तालुक्यातील नागरसोगा येथील एका शेतकऱ्याचा स्वतःच्या शेताजवळ पवन चक्कीसाठी खोदलेल्या खड्ड्यातील पाण्यात बुडून दुर्दैव मृत्यू झाला. सायंकाळी हा व्यक्ती शेतावरून आला नाही. म्हणून त्याची शोधाशोध केली जात होती. पण कुठेच मिळून आला नाही. त्यानंतर पवनचक्कीसाठी खोदलेल्या खड्ड्यातील पाण्यात त्याचा मृतदेह तरंगताना आढळून आला.

याबाबत अधिक माहिती अशी की नागरसोगा येथील राजकुमार शेषराव अडसुळे (वय ४५) शेतकरी मंगळवारी आपल्या शेताकडे गेला होता. दुपारी शेताकडे गेलेला व्यक्ती रात्री उशिरापर्यंत घरी आला नाही. म्हणून घरच्यांनी सर्वत्र शोधाशोध केली.

पण त्याचा कुठेच तपास लागला नाही. दिवसभर पावसाची संततधार सुरू होती. दिवसभरात दोन वेळा ढगफुटी सदृश पाऊस नागरसोगा व परिसरात सुरू होता. या पावसातही त्याचा शोध घेण्यासाठी शेतात गेल्यानंतर शेतातील बंधाऱ्यावर त्याची मोटारसायकल आणि डिक्कीमध्ये मोबाईल व मोटार सायकल शेजारी त्याच्या पायातील चपला सापडल्या होत्या.



पाऊस व अंधार असल्याने त्याचा परत बुधवारी शोध घेतला पण तो कुठेच दिसून आला नाही. अखेर गुरुवारी सकाळी मात्र पवनचक्की साठी खोदलेल्या खड्ड्यांमध्ये त्याचा मृतदेह तरंगताना दिसून आला. याबाबत औसा पोलीस ठाण्यात माहिती देण्यात आली. औशाचे पोलीस निरीक्षक रेवण ढमाले, बीट अंमलदार दिनेश गवळी, अन्य सहकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. जवळगा पोमादेवी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यात आले. त्यानंतर नागरसोगा येथील स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. औसा पोलिसात अकस्मात मृत्यूचा गुन्हा नोंद झाला असून पुढील तपास दिनेश गवळी करीत आहेत.

# शेळ्या चारणाऱ्या तरुणीवर शेतात अत्याचार; तरुणाविरोधात गुन्हा

परभणी। प्रतिनिधी

जिंतूर तालुक्यातील कोलदंडी येथे १९ वर्षीय तरुणीवर विनयभंग व अत्याचार झाल्याची घटना २४ सप्टेंबर रोजी घडली. या प्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आरोपीविरुद्ध चारठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पीडिता शेतात शेळ्या चारत असताना गावातील महादेव उर्फ गोल्या अंकुश पिसाळ हा तेथे आला. त्याने तरुणीचा हात धरून ओढाताण केली, अश्लील भाषेत शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी देत तिच्यावर अत्याचार केला. या प्रकरणी आरोपी महादेव उर्फ गोल्या अंकुश पिसाळ (रा. कोलदंडी, ता. जिंतूर) याच्याविरुद्ध चारठाणा पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. २०४/२०२५ भादंवि कलम ७४, २९६, ११५(२), ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बी. व्ही. झिंजुर्डे करीत आहेत.

# नुकसान झालेल्या शेतकऱ्यांशी बोराडे यांनी साधला संवाद

परतुर। प्रतिनिधी

शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे.पाटील बोराडे यांनी परतुर तालुक्यातील गोळेगाव, गंगासावंगी, चांगतपुरी, संकनपुरी या गावांना भेटी देऊन जायकवाडी धरणातील पाण्याच्या अधिकच्या विसर्गामुळे आणि अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. श्री बोराडे यांनी शुक्रवार ता. २६ रोजी अतिवृष्टीग्रस्त गावांची पाहणी केली.

यावेळी उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले, तालुकाप्रमुख अमोल सुरुंग, युवासेना तालुकाप्रमुख सुरज कुलथे, रामजी खवल, सुभाष धुमाळ, राजेभाऊ कादे, माऊली शेळके, उपसरपंच सत्यजित धुमाळ, सखाराम इंगळे यांची उपस्थिती होती.

या भागातील सोयाबीन, कापूस, तूर, केळी आणि ऊस पिकाचे प्रचंड नुकसान झाल्याचे दिसून आले. ग्रामस्थांच्या घरात पाणी जाऊन संसार उपयोगी साहित्य नष्ट झाले. गोळेगाव आणि गंगा सावंगी येथील ग्रामस्थांनी आपल्या भावना जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे



यांच्याकडे व्यक्त केल्या. शेतकऱ्यांच्या हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून नेला असे सांगुन शेतकऱ्यांनी आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत असा विश्वास जिल्हाप्रमुख श्री बोराडे यांनी ग्रामस्थांना दिला.

यावेळी ग्रामस्थांनी धरणग्रस्तांना जे निकष लागू आहेत त्या निकषानुसार मदत करावी, सानुग्रह अनुदान प्रतिमाणसी १०००/- रुपये देण्यात यावे, शेतकऱ्यांच्या जनावरांना चाऱ्याची व्यवस्था करावी, जास्त क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांचे जास्तीचे नुकसान झाले आणि कमी क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांचेही नुकसान झाले आहे, झालेल्या नुकसानीप्रमाणे आर्थिक मदत करावी, गोळेगाव या गावच्या कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी पाठपुरावा करावा आदी मागण्या केल्या असता सर्व प्रश्नासंदर्भात तातडीने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन शासनाकडे अहवाल पाठविण्यास भाग पाडू असे आश्वासन श्री बोराडे यांनी दिले. यावेळी बाळू अंभूरे, प्रभू येवले, कैलास ढवळे, भगवान वाघमारे यांच्यासह गोळेगाव, गंगासावंगी, चांगतपुरी, संगनपुरी येथील ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# सरकार शक्य तेवढी मदत करणार –मंत्री मकरंद पाटील

परभणी। प्रतिनिधी

राज्यातील अतिवृष्टी व नद्यांमध्ये आलेल्या पुरामुळे सर्वाधिक नुकसान मराठवाड्यात झाले असून शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढावले आहे. काहींच्या शेतीजमिनी वाहून गेल्या, जनावरे मृत्युमुखी पडली, तर अनेकांचे घरे, दुकाने व मानवी जीवितहानीही झाली आहे. अहमदनगर, सोलापूर, बुलडाणा, वाशीम यांसह राज्यातील तब्बल ३० जिल्ह्यांतील १९५ तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. मात्र, मराठवाड्यातील नुकसान सर्वाधिक असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी सांगितले.

पूर्णा तालुक्यातील धानोरा काळे येथे मंत्री पाटील यांनी पुरग्रस्त भागाची पाहणी केली. या वेळी माध्यमांशी बोलताना पाटील म्हणाले की, ''शेतकऱ्यांवर आलेल्या या संकटाच्या काळात सरकार त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. शक्य तेवढी अधिक मदत शेतकऱ्यांना देण्याचा प्रयत्न सरकार करेल. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्री सध्या विविध ठिकाणी पाहणी दौरे करत आहेत.

# लोणीकर पिता-पुत्रांच्या विकास कामांवर विश्वास

## अनेकांचा भाजपात प्रवेश, इतर पक्षात संधी आणि सन्मान मिळत नसल्याची प्रवेशकर्त्यांची खंत

जालना । प्रतिनिधी

भाजपचे दरवाजे राष्ट्राच्या आणि राज्याच्या विकासासाठी काम करू इच्छिणाऱ्या प्रत्येकासाठी खुले आहेत. प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे पक्षात स्वागत आहे. भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून आपल्या गावाचा तालुक्याचा पर्यायाने देशाच्या विकासासाठी प्रत्येकाने हातभार लावावा अशी भावना या प्रवेशावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात मोठा उलटफेर झाला आहे. काँग्रेस राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या पक्षांना मोठा धक्का बसला असून, त्यांच्या शेकडो निष्ठावान कार्यकर्त्यांनी आमदार बबनराव लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे सत्ताधारी भाजपने विरोधी पक्षांच्या गडाला मोठे भगदाड पाडले आहे. आमदार बबनराव लोणीकर यांच्या विकास कामांवर प्रभावित होऊन लोणीकरांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत भारतीय जनता पक्षात प्रवेश करत असल्याचे प्रवेशकर्त्यांनी सांगितले. मंठा तालुक्यातील केंधळी व जालना तालुक्यातील नेर येथील पदाधिकाऱ्यांनी आज भारतीय जनता पार्टी प्रवेश केला.राज्यातील भाजप सरकारच्या विकासात्मक धोरणांवर आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार बबनराव लोणीकर भाजपा महाराष्ट्र प्रदेशाची राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर त्यांचा पूर्ण विश्वास असून केवळ घोषणा न करता, प्रत्यक्ष कामे होत असल्यामुळे भाजपमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना मध्ये स्थानिक पातळीवर प्रभावी नेतृत्वाचा अभाव जाणवत आहे. या पक्षांमध्ये कार्यकर्त्यांना योग्य सन्मान व संधी मिळत नसल्याची खंत देखील प्रवेशकर्त्यांनी व्यक्त केली.





# पालकमंत्री मुंडे, आ. उढाण यांच्याकडून नुकसानीचा आढावा

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी पालकमंत्री पंकजा मुंडे व आमदार हिकमत उढाण हे आले होते. यावेळी

पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी घनसावंगी विधानसभा मतदारसंघातील विरेगाव व कुंभार पिंपळगाव येथे थेट शेतातील पाण्यात उतरून नुकसानीची पाहणी केली.

यावेळी घनसावंगीचे आमदार हिकमत उढाण, राहुल लोणीकर, महायुतीचे नेते, संबंधित अधिकारी, शेतकरी उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या ओल्या डोळयांतून त्यांच्या अडचणी व्यक्त होत होत्या. तातडीने पंचनामे करून मदत पोहोचवावी, यासाठी पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना सूचित केले. घनसावंगी तालुका युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने युवा शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने पालकमंत्री पंकजाताई यांच्याशी पर्जन्यमापकाच्या चुकीच्या रिपोर्टमुळे एनडीआरएफच्या निकषात न बसलेल्या मंडळाचा तात्काळ अतिवृष्टी मध्ये समावेश करण्यासंबंधी चर्चा व मागणीचे निवेदन सादर करण्यात आले.

cmyk

cmyk
राज्य लोकतंत्र
शनिवार, दि.२७ सप्टेंबर २०२५ | ६

# सरकारने नुकसानग्रस्तांना तातडीने भरीव मदत करून ओला दुष्काळ जाहीर करावा - माजी मंत्री जयंत पाटील

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टीसह मराठवाड्यात,सोलापूर धाराशिव ,बीड, यासह अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने अतोनात नुकसान झाले आहे.सरकारने नुकसानग्रस्तांना तातडीने भरीव व ठोस मदत लवकर देऊन ओला दुष्काळ जाहीर करावाअसे प्रतिपादन राज्याचे माजी मंत्री जयंत पाटील यांनी कडा नुकसानीची पाहणी करतांना केले. आष्टी तालुक्यातील अनेक गावांना पुराचा फटका बसलेला आहे.**



आष्टी तालुक्यातील अनेक गावात पावसाने मोठे नुकसानझाले होते.शुक्रवारी धामणगाव कडा,चोभानिमगाव, शिराळ येथे माजीमंत्री जयंत पाटील व खासदार बजरंग सोनवणे यांनी या नुकसानग्रस्त गावांना भेट दिली यावेळी ते बोलत होते. पुढे बोलतांना पाटील म्हणाले की,ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रूपये तर खरडून गेलेल्या जमीनीसाठी ३० हजार तर पशुधनासाठी ६० ते ७० हजार रूपये अशी भरीव मदत द्यावी.तसेच दुकानदारांचे देखील मोठे नुकसान झाले असून त्यांना देखील त्वरीत नुकसान भरपाई मिळावी.सरकारकडे खूप पैसा आहे.असे आम्हाला वाटते.नुकसानग्रस्तांना ही मदत दिवाळीपुर्वी द्यावी.तसेच कर्ज माफीसाठी अधिवेशनात आवाज उठवणार असून या अगोदर देखील आम्ही आवाज उठवला आहे. अशी परिस्थिती बऱ्याच वर्षानंतर महाराष्ट्रात सर्वाधिक मराठवाड्यामध्ये या अतिवृष्टीचा फटका बसला आहे त्यामुळे महाराष्ट्र सरकारने लवकरच ओला दुष्काळ जाहीर करावा असे माजी मंत्री जयंत पाटील यांनी मागणी केली. यावेळी युवक प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख, संगीता ठोंबरे,सुशीला मोराळे, राजे साहेब देशमुख,अण्णासाहेब चौधरी,जिल्हा उपाध्यक्ष सतीश शिंदे,राम खाडे,आष्टी तालुका अध्यक्ष सुनील नाथ, अमोल तरटे, शेख रिझवान,संजय थोरवे,अशोक पोकळे,जगनाथ ढोबळे,राहुल काकडे,याच्यासह तालुक्यातील अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

# पुरात वाहून गेलेल्या महिलेच्या कुटुंबाला आ. धसांच्या हस्ते आर्थिक मदत सुपूर्द

आष्टी प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील शिंदेवाडी येथील शनिवारी (दि.२०) भाग्यश्री गोपाळ खंडागळे (वय ४५ वर्ष) या शेतातून घरी परतत असताना माळेवाडी नदीतीच्या पूरात वाहून गेल्याने पाण्यात बुडुन निधन झाले. त्यांच्या कुटुंबियांना आ. सुरेश धस यांच्या हस्ते ४ लाखांचा आर्थिक मदतीचा धनादेश गुरुवारी (दि. २५) सुपूर्द करण्यात आला.

या घटनेबाबत आ. सुरेश धस यांनी तहसीलदार वैशाली पाटील यांना तातडीने या कुटुंबाला आपत्ती

व्यवस्थापन अंतर्गत मदत देण्याच्या सूचना दिल्या होत्या. खंडागळे कुटुंबियांना नैसर्गिक



आपत्तीची तातडीची शासकीय मदत म्हणून ४ लाख रुपयांचा धनादेश आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्याचे आ लोकनेते. सुरेश धस हस्ते देण्यात आला. यावेळी तहसीलदार वैशाली पाटील, नायब तहसीलदार मोहिते, ग्राम महसूल अधिकारी बाळासाहेब बनगे, सचिन काकडे, सचिन पवार व संतोष खंडागळे हे उपस्थित होते. संकट काळी मदतीचा हात मिळाल्याने खंडागळे कुटुंबांनी आमदार सुरेश आण्णा धस व तहसिलदार वैशाली पाटील मॅडम यांचे आभार मानले.

# पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते पो.अ. बजरंग बनसोडे यांना रौप्यपदक प्रदान

आष्टी । प्रतिनिधी

सध्या मुंबई येथे गुन्हे शाखेच्या पोलीस उपायुक्तपदी नियुक्तीवर असलेले आष्टी तालुक्याचे भूमिपुत्र बजरंग आनंदराव बनसोडे यांना उत्कृष्ट कामगिरी बद्दल विशेष तपास यंत्रणाचे () महासंचालक सदानंद दाते यांच्या हस्ते रौप्य पदक गुरूवार दि.२५ रोजी प्रदान करण्यात आले.




१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्त भारत सरकार गृह मंत्रालय अंतर्गत () राष्ट्रीय तपास यंत्रणा यांचे महासंचालक यांचे कडून बजरंग बनसोडे यांना रौप्य पदक जाहीर करण्यात आले होते.मुंबई येथे राष्ट्रीय तपास यंत्रणा अंतर्गत पोलीस अधीक्षक पदी कार्यरत असताना मागील वर्षी केलेल्या विशेष कामगिरीबद्दल रौप्यपदक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे. मागील तीन वर्षापासून बनसोडे हे एनआयए मधे कार्यरत होते.त्या काळात त्यांनी अनेक गुंतागुंतीचे गुन्हे उघडकीस आणले होते. त्यांच्या या कार्याची दखल घेत रौप्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले आहे.त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.बजरंग बनसोडे यांनी मोठ्या मेहनतीने व काबाड कष्टातुन हे यश संपादन केले आहे एका शेतकरी कुटुंबातील व्यक्तींने ऐवढी मोठे यश संपादन केले आहे त्याचा यशाचा प्रवास तरुण पिढीला प्रेरणादायी आहे.

# रासेयो विभागाच्या वतीने स्वच्छता रॅली व प्रतिज्ञा कार्यक्रमाचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी जय कला व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने आज २५ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या आदेशावरून व माननीय प्राचार्य डॉ विश्वासराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाची सन्माननीय प्राचार्य डॉक्टर प्राध्यापक सोमनाथ घाडगे सर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी



विद्यार्थी यांना स्वच्छतेची शपथ देऊन महाविद्यालयात व पाटोदा परिसरात स्वच्छता रॅलीचे आयोजन करण्यात आली या स्वच्छता रॅलीत महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी स्वयंसेवक विद्यार्थी विद्यार्थिनी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रमाधिकारी ◀◀ पान २ वर

# प्रा.डॉ. नामदेव सानप यांच्या मार्गदर्शनाखाली सरला नाईक यांना पीएच.डी.

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागातील संशोधिका श्रीमती सरला भालचंद्र नाईक यांनी प्रा.डॉ. नामदेव सानप यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाला सादर केलेले संशोधन कार्य स्वीकारून त्यांना वृत्तपत्रविद्या विषयात पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे.



संशोधक विद्यार्थीनी श्रीमती सरला नाईक यांनी प्रा. डॉ. नामदेव सानप यांच्या मार्गदर्शनाखाली आपले शोधकार्य ,''इतर मागासवर्ग प्रवर्गाच्या सामाजिक समस्या व मुद्रित माध्यमांची भूमिका :लोकमत व दैनिक दिव्य मराठी वृत्तपत्रांचा तुलनात्मक विशेष अभ्यास'' या विषयावर सादर केले होते. श्रीमती सरला नाईक यांचे शोधकार्य स्वीकारून विद्यापीठाद्वारे त्यांना पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे. याबद्दल विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. दिनकर माने संशोधन मार्गदर्शक प्रा. डॉ.नामदेव सानप, प्रा. बसवराज बिराजदार, प्रा. रमेश वाघ आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# आनंदराव धोंडे कालेजचा पूरग्रस्तांना मदतीचा हात

## पुरबाधितांना ३०० ब्लँकेट्सचे वाटप करून दिलासा

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाने पुरग्रतांना मदत केली.गेल्या आठवड्यामध्ये बीड जिल्ह्यासह आष्टी तालुक्याला मुसळधार व ढगफुटी सदृश्य पावसाने झोडपले. त्यामुळे शेतकरी, शेतमजूर, छोट्या -मोठ्या व्यापारी वर्गाचे प्रचंड नुकसान झाले. अनेकांचे पिके, शेतजमीनीसह संसार पाण्यात वाहून गेले.आष्टी तालुक्यातील अनेक गावांमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे अनेक



गावातील शेकडो पशुधन पाण्याखाली गेली.या आपत्तीमुळे सर्वत्र हाहा:कार माजला असून शेकडो कुटूंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत.

अशा कठीण प्रसंगी आनंद चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या प्रेरणेतून कडा येथील आनंदराव धोंडे ऊर्फ बाबाजी महाविद्यालयाने सामाजिक उत्तरदायित्वच्या भावनेतून पूरग्रस्तांना मदतीचा हात दिला. महाविद्यालयाच्या वतीने कडा, धामणगाव,दादेगाव, देविनिमगाव, देवळाली, चोभानिमगाव, सुलेमान देवळा, टाकळी, शिरापूर, रुईनालकोल आदि गावातील पुरबाधितांना ३०० ब्लँकेट्सचे वाटप करून शेकडो पीडितांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरिदास विधाते,कर्मचारी वर्ग, स्वयंसेवकांनी मिळून ही मदत कार्यवाही पार पाडली.स्थानिक नागरिकांनी महाविद्यालयाच्या या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले आहे.अशा कार्यामुळे समाजात परस्पर मदतीची भावना दृढ होत असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# ना.भुजबळ यांच्या उपस्थितीत होणाऱ्या ओबीसी महाएल्गार मेळाव्यास उपस्थित रहावे - ॲड. राऊत

बीड । प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या उपस्थितीत रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड येथे ओबीसी महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून ओबीसी महाएल्गार मेळाव्यास ओबीसी समाज बांधव, भगिनींनी, युवक, युवती, विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांनी लाखोंच्या संख्येने



उपस्थित राहावे असे आवाहन मेळाव्याचे आयोजक तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत हा महाएल्गार मेळावा होणार असून याप्रसंगी राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे साहेब, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते आमदार आ. गोपीचंद पडळकर,धनगर समाजाचे नेते मा.प्रकाश आण्णा शेंडगे. मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, वंजारी समाजाचे नेते सत्संग ◀◀ पान २ वर

# कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापतीच्या विरोधातील अविश्वास ठरावाच्या बैठकीला उच्च न्यायालयाची स्थगिती

## बाजार समितीमध्ये आमदार सोळंके व माजी आमदार आंधळे यांचा राजकीय वाद पेटला

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे भाजपचे उपसभापती अनिल आश्रूबा चोले यांच्या विरोधात आ. सोळंके गटाच्या १४ संचालकांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे अविश्वास ठराव दाखल केलेला होता यामध्ये चोले यांनी मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती यामध्ये माननीय न्यायालयाने पुढील अंतिम निकाल लागेपर्यंत कसली बैठक न घेण्याचा आदेश केल्याने काल दिनांक २६ सप्टेंबर रोजी वडवणी बाजार समिती येथे आयोजित केलेल्या अविश्वास ठरावाच्या विशेष बैठकीला स्थगिती दिली आहे.

वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये राष्ट्रवादीचे आमदार प्रकाश सोळके यांच्या गटाचे संभाजीराव शिंदे हे सभापती तर भाजपचे माजी आमदार केशवराव आंधळे यांच्या गटाचे अनिलराव चोले हे उपसभापती असुन यामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकी पासून आमदार सोळंके व माजी आमदार आंधळे यांच्यामध्ये झालेल्या राजकीय मतभेदाचे पडसाद वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये असलेल्या युतीत पहावयास मिळत असून यामध्ये आमदार सोळंके यांच्या आदेशानुसार दिनांक २५ ऑगस्ट रोजी १७ पैकी १४ सदस्यांनी बैठक घेऊन उपसभापती अनिलराव चोले यांच्याविरुद्ध अविश्वास ठराव घेऊन माननीय जिल्हाधिकारी बीड,उपजिल्हा निबंधक बीड यांच्याकडे दाखल करण्यात आलेला होता यामध्ये सहाय्यक निबंधक शिरूर कासार यांची अविश्वास ठरावा संदर्भात विशेष बैठक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली व त्यांनी वडवणी बाजार समिती येथे संचालकांना नोटीस देऊन २६ सप्टेंबर रोजी विशेष बैठकीचे आयोजन केलेले होते याच बैठकीचे आदेशा विरोधात ◀◀ पान २ वर

# नुकसानग्रस्त एकही शेतकरी वंचित राहणार नाही याची काळजी घ्या : बाळासाहेब आडसरे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

तालुक्यात आठ दिवसांपासून पावसाने जोरदार हजेरी लावल्याने नदी,नाल्यांसह ओढ्याला मोठ्या प्रमाणावर पाणी आल्याने नदीकाठसह शेतातील पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे अन्? एक ही आजी माजी तालुका प्रतिनिधी फीरकले नाहीत महसुल खात व पदाधिकारी हे तोंड पाहून फक्त नदीकाठचे पंचनामे करतात ते ही घरात बसुन असा बाळासाहेब आडसरे यांचा आरोप आहे यांनी सर्व नुस्कान ग्रस्त शेतकऱ्याची कहाणी प्रसार माध्यमांना सांगितली त्यांनी सविस्तर गावातील झालेले नुकसानीचे पंचनामे करावेत अशी मागणी प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी करावी अशी मागणी त्यांनी केली



प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे सुरू असून एकही नुकसानग्रस्त शेतकरी यापासून वंचित राहणार नाही यासाठी काळजी पुर्वक लक्ष द्यावे व शेडाळा ग्रामपंचायत व ग्रामस्थांना एक मदतीचा हात द्यावा अशी विनंती करण्यात आली

त्यांनी परिसरातील शेतातील नुकसानीची ◀◀ पान २ वर


|| सुवर्णसंधी ||

**महिला वसतिगृहात प्रवेश देणे सुरू आहे**

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळ गेवराई संचलित, कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड येथील महिला वसतिगृहात वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थीनींना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये प्रवेश देणे सुरू आहे. असे आवाहन प्राचार्यांनी केले आहे.




प्राचार्य
जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा ता.पाटोदा जि.बीड ४१४२०४


# जीवनात यशस्वी होण्यासाठी सकारात्मक विचारांची आवश्यकता -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जीवनात यशस्वी होण्यासाठी आणि ध्येय प्राप्ती करीता सकारात्मक विचार आवश्यक आहेत, युवकांनी सतत चांगल्या विचारांतून प्रगतीच्या वाटेवर पुढे जाण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे प्रतिपादन प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ, तथा अंबाजोगाई नगरपरिषदेचे माजी शिक्षण सभापती सामाजिक कार्यकर्ते डॉ.राजेश इंगोले यांनी केले.

येथील स्वामी रामानंद तीर्थ



महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ◀◀ पान २ वर






This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# पुण्यातील बँक कर्मचाऱ्याचा प्रताप! दिवसा बँकेत नोकरी अन् रात्री घेत होता मटक्याचे आकडे, १७ जणांवर गुन्हा

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात एका उच्चशिक्षित बँक कर्मचाऱ्याच्या प्रताप समोर आला आहे. दिवसा बँकेत नोकरी करणारा तरुण रात्री मात्र ऑनलाईन मटक्याचे आकडे घेण्याचे काम करत होता. खडक पोलिसांनी केलेल्या कारवाईत हा प्रकार उघडकीस आला असून, संबंधित बँक कर्मचाऱ्यासह आणखी १७ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पुण्यात एका बँक कर्मचाऱ्याचा ऑनलाईन मटका जुगारात सहभाग असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी खडक पोलिसांनी बँकेत नोकरी करणाऱ्या राहुल दिलीपसिंग परदेशी (वय ४२, रा. स्वामी समर्थ अपार्टमेंट, बेनकर वस्ती, धायरी गाव) याला अटक केली आहे. त्याच्यासोबत ऑनलाईन मटका खेळणाऱ्या आणखी १७ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राहुल परदेशी हा इ.उे पदवीधर आहे. सध्या तो बँकेत नोकरी करतो. दिवसा बँकेतील कामकाज सांभाळून रात्री ऑनलाईन मटक्याचे आकडे घेत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. या प्रकरणी पोलीस अंमलदार आशिष आदिनाथ चव्हाण यांनी खडक पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार, २५ सप्टेंबर रोजी पोलीस अंमलदार आशिष जाधव व इरफान नदाफ हे पोलीस ठाण्यात असताना, त्यांना माहिती मिळाली की निळू फुले जलतरण तलावाजवळ एक व्यक्ती मोबाईल फोनद्वारे मटक्याचे आकडे सांगून जुगाराचे बुकींग घेत आहे.ही माहिती मिळाल्यानंतर सहायक पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सूचित करून तात्काळ पथक रवाना केले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असता, तेथे एक व्यक्ती मोबाईलवर मटक्याचे आकडे घेताना आढळून आला. त्यावेळी राहुल परदेशी याला ताब्यात घेण्यात आले.पोलिसांनी झडती घेतली असता राहुलकडून ५६२ रुपये रोख, मोबाईल फोन, असा एकूण ३५६२ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपासात, त्याच्या मोबाईलवरील व्हॉट्सअॅप चॅट्स तपासल्यानंतर त्याने १७ वेगवेगळ्या व्यक्तींना मटक्याचे आकडे पाठवून बुकींग घेतल्याचे निष्पन्न झाले.चौकशीदरम्यान राहुल परदेशी याने कबूल केले की, तो सुरज ज्ञानेश्वर गायकवाड याच्यासाठी काम करत होता. तो व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून ग्राहकांना मटक्याचे आकडे पाठवत असे आणि त्याबदल्यात रोख रकमेसह विविध मनी ट्रान्सफर अॅप्सद्वारे पैसे स्वीकारत असे. या प्रकरणात खडक पोलिसांनी १७ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. विशाल शेडगे (रा. लोहियानगर), सुरज ज्ञानेश्वर गायकवाड (रा. खडकमाळ आळी), मुकेश सातपुते (रा. पानघंटी चौक), प्रतीक बनकर (रा. झगडेवाडी), विजयसिंग बाळारामसिंग परदेशी (मामा) (रा. घोरपडी पेठ), शिवा धनगर (रा. पदमावती), सुनिल वाघ (रा. सिंहगड रोड), बालाजी दत्तात्रय गट्डे (रा. सदाशिव पेठ), सचिन मधुकर सुपेकर (रा. पर्वती दर्शन), सचिन पालवे (रा. शिवतेजनगर, कोथरुड), विलास दिवाणे (रा. खडकमाळ आळी, राठी वाडा), रहीम शेख (अब्दुल रहिम हजारी शेख) (रा. एम जी रोड, कॅम्प), शुभम गोडसे, अन्ना शिंदे (रा. बिबवेवाडी), शुभम सुरेश कामदुले (रा. खडकमाळ आळी), अक्षय सुभाष तेलवडे अशी गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत.

# उंड्रीत इमारतीच्या बाराव्या मजल्यावर भीषण आग; सिलेंडर स्फोटात १५ वर्षीय मुलाचा मृत्यू



**पुणे । प्रतिनिधी**

उंड्री येथील जगदंब भवन मार्गावरील मार्वल आयडियल सोसायटीच्या चौदा मजली इमारतीत गुरुवारी सायंकाळी बाराव्या मजल्यावरील एका सदनिकेत भीषण आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाकडून पाच अग्निशमन वाहने व एक उंच शिडीचे वाहन तातडीने घटनास्थळी दाखल करण्यात आले.

अग्निशमन दलाचे जवान आग विझवण्याचा प्रयत्न करत असतानाच अचानक घरातील गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. या दुर्घटनेत अग्निशमन दलाचे दोन जवान व तीन नागरिक जखमी झाले असून, १५ वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

सध्या आग नियंत्रणात आली असून दलाकडून कुलिंग ऑपरेशन सुरू आहे. अपघातामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिस व महापालिकेचे अधिकारी घटनास्थळी उपस्थित आहेत.

# महापालिका व मिशन रेबीजच्या वतीने रेबीज लसीकरण मोहीम

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

दि. २८ सप्टेंबर हा दिवस सर्वत्र जागतिक रेबीज दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून 'पशुवैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका' व 'मिशन रेबीज' यांचे संयुक्त विद्यमाने महानगरपालिका हद्दीत २६ सप्टेंबर २०२५ ते ३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत रेबीज लसीकरण सप्ताह साजरा करण्यात येत आहे. या निमिताने आज महानगरपालिकेमार्फत पाळीव श्वानांना पशुवैद्यकीय दवाखाना (नेहरूनगर व निगडी प्राधिकरण) येथे तसेच भटक्या श्वानांना श्वान पथकामार्फत मोफत लसीकरण करण्यात आले. श्वानपालकांनी व प्राणीप्रेमींनी आपल्या श्वानांचे लसीकरण करुन घेतले.



या निमिताने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांचे मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकीय विभागामार्फत लसीकरण कार्यक्रम राबविण्यात आला. सदर कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी नेहरूनगर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात उपस्थित राहून पशुपालक व पशुप्रेमी तसेच कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. उपआयुक्त संदीप खोत यांनी कार्यक्रमाबद्दल तसेच विभागातील विविध उपक्रमाबद्दल माहिती दिली. कार्यक्रमास मुख्य पशुसंवर्धन अधिकारी डॉ. अरुण दगडे, पशुधन विकास अधिकारी डॉ. स्वप्नील शिंदे, श्री. जयदीप पुरोहित (उढज), श्री. रौनक (चखडडखजछ ठ-इखएड) व विभागाचे सर्व अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते. महानगरपालिका व चखडडखजछ ठ-इखएड यांचे संयुक्त विद्यमाने रेबीज या रोगाबद्दल जनजागृती व रेबीज संसर्गजन्य रोगाचे मुळापासून निर्मुलन करणेकरिता जागतिक रेबीज दिनाच्या निमित्ताने पशुवैद्यकीय विभागामार्फत लसीकरण व जनजागृती मोहिम राबविण्यात आली.

शहरातील विविध ठिकाणी प्रक्षेत्रावर ४ पशुवैद्यकीय पथके व चखडडखजछ ठ-इखएड पथक तैनात करून भटक्या व बेवारस श्वानांचे लसीकरण करण्यात आले. लसीकरण करताना शहरातील विविध प्राणी प्रेमींद्वारे सहकार्य करण्यात आले.

पशुवैद्यकीय पथक :-

१) पशुवैद्यकीय अधिकारी - १ २) पशुधन पर्यवेक्षक - १ ३) डॉग क्याचर - ३ ४) आरोग्य निरीक्षक - १

लसीकरण करण्यात आलेले ठिकाण :- १) रावेत परिसर २) चिंचवडगाव परिसर ३) मोशी परिसर ४) भोसरी / दिघी परिसर

# बघता बघता रमेश आप्पासोबत माझीही केसं उडाली! अजित पवारांची बारामतीती मिश्कील फटकेबाजी

**बारामती । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या (झऊउउ इरपज्ञ) सर्वसाधारण सभेत बारामतीत हजेरी लावताना शेतकऱ्यांचे हित, बँकेचे आधुनिकीकरण आणि ऑनलाइन गेमिंगपासून सावध राहण्याचा सल्ला दिला. सगळ्याच गोष्टी नियमांवर बोट ठेऊन करू नका, शेवटी बळीराजा जगला पाहिजे, असं सांगत त्यांनी बँक अधिकाऱ्यांना शेतकऱ्यांच्या कल्याणाला प्राधान्य देण्याचे निर्देश दिले. यावेळी त्यांनी मिश्कील शैलीत अनेक मुद्द्यांवर भाष्य करत उपस्थितांमध्ये हशा पिकवला.

अजित पवारांनी बँकेच्या सभेच्या व्यवस्थेवरही लक्ष केंद्रित केलं. अल्पबचत भवनात जागा अपुरी पडते. पुढची सभा गणेश कला क्रीडा भवनात घ्या. प्रत्येक सभासदाला बसायला खुर्ची मिळायलाच हवी, अशी प्रेमळ सूचना त्यांनी संचालकांना दिली. बँकेच्या संचालकपदाचा राजीनामा का दिला, यावर ते म्हणाले, उगीच जागा अडवायची नव्हती. मी बँकेत आलो तेव्हा रमेश आप्पा कारभार पाहायचे. त्यांना काय माहिती हा बाबा डोक्यावर येऊन बसणार! पण बँक बघता-बघता रमेश आप्पांसोबत माझीही केसं उडाली! या मिश्कील टिप्पणीने सभागृहात हलकाफुलका माहोल



निर्माण झाला. बँकेच्या नोकरभरतीवर बोलताना अजित पवार म्हणाले, गुणवत्ता पाळलीच पाहिजे. पण जिल्ह्यातील मुलांना शक्यतो संधी द्या. मेरीट बघा रे बाबांनो! असा मिश्कील सल्ला देत त्यांनी स्थानिक तरुणांना प्राधान्य देण्याची सूचना केली. बँकेच्या आर्थिक व्यवस्थापनावरही त्यांनी भाष्य केलं. ३ लाखांपेक्षा जास्त कर्ज देताना २,४०० लोकांसाठी ९ कोटी रुपये व्याज सवलत द्यावी लागते. हे परवडत नाही. खातेफोड करा, पण बँकेवर बोजा टाकू नका, असं ते म्हणाले. २.८८ लाख शेतकऱ्यांना ३ लाखांपर्यंतच्या कर्जासाठी ९ कोटींची व्याज सवलत दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

पीडीसीसी बँक काळासोबत चालते. एआय तंत्रज्ञानासाठी ३ कोटींची तरतूद केली आहे. बँकेत १५ हजार कोटींहून अधिक मुदत ठेवी आहेत आणि ती नफ्यात आहे, असं सांगत अजित पवारांनी बँकेच्या प्रगतीचं कौतुक केलं. कर्मचाऱ्यांना शिस्तीचं महत्त्व सांगताना ते म्हणाले, शिपाई लोकांनो, मॅनर्स पाळा. नाहीतर म्हणाल, दादाने लावलंय तर काय! ड्रायव्हरनी गाड्या नीट चालवाव्यात.

ऑनलाइन गेमिंगच्या वाढत्या प्रभावावर चिंता व्यक्त करत अजित पवार म्हणाले, मुलांना जास्त लाडावू नका. पब्जी खेळून एका महिलेचं बँक खातं मुलानेच रिकामं केलं. ड्रिम११ खेळत बसू नका. एकटाच नागोजी डोक्यावर बसतो! पालकांना सावध राहण्याचा सल्ला देताना त्यांनी सभासदांचे कान टोचले. मी बोर्डावर नसलो तरी माझं बारीक लक्ष आहे. तुमचं पाठबळ असंच राहू द्या, असं आवाहन त्यांनी केलं.

# नाथाभाऊंच्या जावयाला मोठा दिलासा; प्रांजल खेवलकर दोन महिन्यांनी येणार तुरूंगाबाहेर

**पुणे । प्रतिनिधी**

खराडी येथील हॉटेलमध्ये झालेल्या कथित अमली पदार्थ पार्टी प्रकरणात आरोपी डॉ. प्रांजल खेवलकरला विशेष न्यायाधीश जे. जी. डोरले यांनी जामीन दिला आहे. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दोन महिन्यांपासून कोठडीत असलेल्या डॉ. खेवलकरची जामिनावर सुटका होणार आहे. डॉ. खेवलकर हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते व माजी मंत्री एकनाथ खडसे यांचे जावई आहेत.

खेवलकरने अॅड. हृषीकेश गानू आणि अॅड.पुष्कर दुर्गे यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज केला होता. याच प्रकरणात प्राची शर्मा हिचाही जामीन झाला आहे. तिने अॅड. राजू लक्ष्मणराव मते आणि अॅड. श्रीनाथ राजू मते यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज केला होता.खराडीतील 'हॉटेल स्टेबर्ड'मधील एका खोलीत २७ जुलै



रोजी सुरू असलेल्या अमली पदार्थ पार्टीवर पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने छापा टाकला. डॉ. खेवलकर याच्यासह सात आरोपींना अटक केली. आरोपींकडून २.७० ग्रॅम कोकेनसदृश पदार्थ, ७० ग्रॅम गांजा, हुक्का सेट, दारूच्या बाटल्या, दोन वाहने असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस कोठडीत प्राथमिक चौकशी झाल्यानंतर न्यायालयाने सर्व आरोपींची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली होती. त्यानंतर खेवलकरने अॅड. हृषीकेश गानू आणि अॅड. पुष्कर दुर्गे यांच्यामार्फत न्यायालयात जामीनासाठी अर्ज केला. विशेष न्यायालयाने तपास अधिकारी, सरकारी वकील व बचाव पक्षाच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकून घेत खेवलकरला जामीन मंजूर केला. या प्रकरणात सर्व आरोपींविरोधात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

# चार कुख्यात गुन्हेगारांना दोन वर्षांसाठी हद्दपार

***शिरूर । प्रतिनिधी***

शिरूर तालुक्यातील कुख्यात गुन्हेगारांना प्रशासनाने चांगलाच धडा शिकवला आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावा यासाठी चार गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांना दोन वर्षांसाठी तालुक्याबाहेर हद्दपार करण्याची कडक कारवाई करण्यात आली आहे.

शिरूर उपविभागीय अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५७ अन्वये दिलेल्या आदेशानुसार, रोहित बाळासाहेब उर्फ प्रमोद कर्डिले, (रा. निमोणे), अनिल शिवाजी काळे (रा. निमोणे), महेश मच्छिंद्र गायकवाड (रा. शिरूर) अनिकेत उर्फ दाद्या दिलीप पठारे, (मुळगाव- मावळेवाडी, ता. पारनेर, सध्या रा. बाबुराव नगर, शिरूर) या चार इसमांना हद्दपार करण्यात आले आहे. या चौघांना संपूर्ण पुणे जिल्हा, पिंपरी-चिंचवड आयुक्तालय, पुणे शहर आयुक्तालय तसेच अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर व श्रीगोंदा तालुक्याच्या हद्दीतून दोन वर्षांसाठी हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. निवडणुकांचा काळ असताना गुन्हेगारीला अजिबात वाव देणार नाही. समाजात दहशत माजवणाऱ्यांना कायद्याच्या चौकटीत ठेवले जाईलच, पण आवश्यक असल्यास अशी कठोर कारवाई पुन्हा करण्यात येईल, असा इशारा पोलिस उपविभागीय अधिकारी प्रशांत ढोले यांनी दिला आहे. या कारवाईमुळे गावोगाव शांतता व कायदा सुव्यवस्था अबाधित राहणार असून नागरिक निर्धास्तपणे मतदान करू शकतील, अशी प्रतिक्रिया स्थानिकांतून व्यक्त होत आहे.

# गांजाविक्री करणा-या एकाच कुटुंबातील तीन महिला जेरबंद

**पुणे । प्रतिनिधी**

विमानतळ पोलिसांनी गांजाविक्री करणाऱ्या एकाच कुटुंबातील तीन महिलांना रंगेहात पकडण्यात यश मिळवले आहे. त्यांच्या ताब्यातून ३० हजार रुपये किंमतीचा १५६० ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, २५ सप्टेंबर रोजी विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत पेट्रोलिंगदरम्यान तपास पथक प्रभारी पोलीस उपनिरीक्षक नितीन राठोड यांना खुळेवाडी, चंदननगर परिसरात काही महिला गांजाविक्री करत असल्याची गुप्त माहिती मिळाली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा रचून सोनाबाई अंकुश पवार (५०), सुवर्णा अशोक पवार (२५) व शालन कांतीलाल जाधव (४५) या महिलांना गांजा विक्री करताना पकडण्यात आले.



त्यांच्याविरुद्ध विमानतळ पोलीस ठाण्यात रजिस्टर क्रमांक ४७४/२०२५, एनडीपीएस अॅक्ट कलम ८ (क), २० (ब)(ळळ)(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चेतन भोसले करत आहेत. ही कारवाई अपर पोलीस आयुक्त (पूर्व) मनोज पाटील, पोलीस उपायुक्त परि-०४ सोमय मुंडे, सहायक पोलीस आयुक्त येरवडा विभाग प्रांजली सोनवणे यांच्या आदेशान्वये व वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोविंद जाधव, पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

या पथकात उपनिरीक्षक नितीन राठोड, तसेच पोलीस अंमलदार सना शेख, लालु कन्हे, हरीप्रसाद पुंडे, रुपेश पिसाळ, शैलेश नाईक, राकेश चांदेकर, अंकुश जोगदंडे, योगेश थोपटे, ज्ञानदेव आवारी, सचिन मांजरे व दादासाहेब बर्डे यांनी सहभाग घेतला.

# एस सी मधून आरक्षण न दिल्यास मंत्री खासदारांचे कपडे धुणे बंद :धोबी समाजाचा इशारा

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

संविधान आणि गॅझेटनुसार धोबी समाज हा एससी मध्ये असल्याने या समाजाला एससी चे आरक्षण देण्यात यावे अन्यथा धोबी समाज मंत्री आमदार खासदार यांचे कपडे धुने बंद करणार असा इशारा धोबी समाजाच्या वतीने आज झालेल्या पत्रकार परिषदेत देण्यात आला यापूर्वी समाजाच्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

भारतात पंरपरेनुसार धुण्याचे काम करणारा व स्वःताला धर्माने हिंदु म्हणुन घेणारा धोबी समाज आहे. संपूर्ण देशात त्यांचे उपजिवीकेचे प्रमुख साधन एकच असुन धोबी समाजाचे राजकीय, शैक्षणिक, धार्मिक शोषण होत आहे. संपूर्ण देशात उपजिविका व व्यवसाय सारखाच असुन देशातील १८ राज्यात हा समाज अनुसुचित जातीत आहे व नवीन महाराष्ट्र निर्मितीपुर्वी भंडारा व बुलढाणा जिल्हात हा समाज महाराष्ट्रात अनुसुचित जातीत होता. मात्र आता तो कुठल्याही नियमांचा आधार न घेता ओबीसी प्रवर्गात टाकण्यात आलेला आहे. हा आमच्या वरील अन्याय आहे.





एकाच देशात सारखीच उपजिवीका व पांरपारिक व्यवसाय असणाऱ्या समाजावर भेदभाव व अन्याय होत आहे. दवाखान्यातील व स्त्रियांची कपडे किती अस्वच्छ असु शकता यांची सर्वांना कल्पना आहे. अश्या अस्वच्छ कपडयांना स्वच्छ करणारे यांना अस्वच्छ व्यवसाय करणारे म्हणुन अस्पृश्या असल्या बाबत कोणता पुरावा द्यायला पाहिजे? या सर्ववावी व १९३६ ते १९६० पर्यंत बुलढाणा व भंडारा या महाराष्ट्रातील दोन्ही जिल्हांना अनुसुचित जातीच्या सवलती मिळल्या होत्या. तसेच वन्हाड (आत्ताचा विदर्भ) यात रायसेन, सिहोर, भोपाळ, बुलढाणा व भंडारा यांना अनुसुचित जातीच्या सवलती मिळत होत्या. मात्र १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य बनले. यातील भंडारा व बुलढाणा महाराष् राज्यात आले व त्यांच्या सवलती कुठल्याही नियमांचा आधार न घेता शिफारशी बंद झाल्या. हा समाजावरील अन्याय नाही का ?असे समाज संघटनेचे

प्रमुख दाणे ,पर ,काटे यांनी म्हटले २८ नोव्हेंबर १९७६ च्या घटना दुरुस्तीनुसार व अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती दुरुस्ती कायदा १९७६ नुसार राजस्थानमधील अजमेर जिल्हातील धोबी समाज अनुसुचित जातीमध्ये होता, त्याआधारे संपूर्ण धोबी समाजाचा समावेश संपूर्ण राजस्थान राज्यात अनुसुचित जातीत करण्यात आला. त्याआधारे महाराष्ट्रातील भंडारा व बुलढाणा जिल्हातील अनुसुचित जातीत असलेल्या धोबी समाजाचे राजस्थान राज्याप्रमाणे महाराष्ट्र राज्याने अनुसुचित जाती-जमाती दुरस्ती कायद्यानुसार धोबी समाजाचा अनुसुचित जातीत समावेश करावा समावेश करावा.

६५ वर्षे पासुन आपल्या हक्कासाठी लढणाऱ्या धोबी समाजाने भारत सरकार व महाराष्ट्र सरकार कडे दाद मागितली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने तत्कालीन आमदार डॉ. डी.एम. भांडे यांच्या अध्यक्षेतेखाली ५ सप्टेंबर २००१ रोजी धोबी समाज पुर्नएकीकरण समितीची स्थापना करुन हा समाज अस्पृश्यतेचे निकष पूर्ण करतो व महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगानेही राष्ट्रपतीच्या १९६० च्या आदेशानुसार महाराष्ट्र सरकारला हि शिफारस केली होती. यात धोबी - परीट, वरठी, तेलगु, मडलेवार, रजक समाज यांचा समावेश आहे. वरिल संदर्भ नुसार केंद्र सरकारकडे भांडे समितीने शिफारस केलेली आहे. १९६० पुर्वी अनुसुचित जातीत असणाऱ्या महाराष्ट्रातील धोबी समाजाला पुर्वी प्रमाणेच अनुसुचित जातीत समावेश करून आरक्षण दयावे. अशी मागणी करण्यात आली

# गणेश कवडे यांची भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती; ओझरमध्ये जल्लोषात स्वागत



**ओझर । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या पुणे जिल्हा कार्यकारिणीची घोषणा आज शुक्रवारी करण्यात आली. यामध्ये गणेश कवडे यांची भाजप युवा मोर्चा पुणे जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे. या निवडीमुळे ओझर गावात उत्साहाचे वातावरण पसरले असून, गावकऱ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि गुलाल उधळत कवडे यांचे जंगी स्वागत केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार महेश लांडगे, आमदार राहुल कुल, आमदार योगेश टिळेकर, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, भाजप प्रदेश महामंत्री राजेश पांडे, महामंत्री मकरंद देशपांडे, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, पुणे जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद, जुन्नर विधानसभा प्रमुख आशा बुचके यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी जाहीर झाली.

गणेश कवडे यांनी अश्वमेध युवा मंचातून तालुक्यातील युवाशक्ती एकत्रित केली असून, श्री विघ्नहर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष म्हणून त्यांनी मंदिराचा कायापालट केला आहे. गावकऱ्यांचे प्रेम आणि पाठबळ माझी ऊर्जा आहे. पुणे जिल्ह्यातील युवाशक्तीला संघटित करून भाजपचा झेंडा उंच फडकवू, असे कवडे यांनी सांगितले.